K L THAKUR AND SONS SARAF
Since 1928
Gold | Silver | Diamond
3209, Bagwanpur, Kamod Road, Nasik-422001
0253-2505488 | 2504258

नाशिक जिल्ह्यातील सर्वाधिक खपाचे पहिले सायंदैनिक
किंमत २
# भ्रमर
BHRAMAR

Physioflex. Working towards healthy lifestyle
Physiotherapy Clinic & Fitness Studio
Dr. Moinuddin Farooque (CEO physioflex)
PHYSIOTHERAPIST (M.S.P.T.)
9021756646 8329099901
Physiofit Clinic, Shop Number 2, Jumma Masjid, Naikwadi Pura, Patil Gali, Old Nashik
Shivraya Multi Speciality Hospital, DGP Nagar 2, Ambad Link Rd., Near Mauli Lawns, Kamatwade, Nashik

वर्ष ५३ वे, अंक ३११ | Year : 53, Issue No. : 311
नाशिक, सोमवार दि. ४ मे २०२६ | Nashik, Monday 4 May 2026
R.N.I. Regd. No.20904/72 | Postal Reg. No. NSK/16/2024-2026
पाने ६, किंमत २ रुपये | Pages : 6, Price Rs. 2

## बारामतीत सुनेत्रा पवार, राहुरीत अक्षय कर्डिले आघाडीवर

**मुंबई (भ्रमर वृत्तसेवा) :- बारामतीत उपमुख्यमंत्री सुनेता पवार तर राहुरीत अक्षय कर्डिले हे दोन्ही उमेदवार मतमोजणीत आघाडीवर असून, विजयाच्या दिशेने वाटचाल करीत आहे.**



पुणे जिल्ह्यातील बारामती आणि अहमदनगर जिल्ह्यातील राहुरी विधानसभा मतदारसंघांच्या पोटनिवडणुकीची मतमोजणी पार पडत आहे. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर बारामतीत आणि भाजपचे आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या निधनानंतर राहुरी विधानसभा मतदारसंघात पोटनिवडणुक होत आहे. बारामतीमध्ये सुनेत्रा पवार निवडणुक लढवत आहेत तर शिवाजी कर्डिले यांचा मुलगा अक्षय कर्डिले निवडणुकीच्या रिंगणात आहे. मत मोजणीला सुरुवात झाली आहे. काही वेळातच दोन्ही ठिकाणचे चित्र स्पष्ट होईल.

बारामती विधानसभा पोटनिवडणुकीचा निकाल लवकरच जाहीर होणार आहे. मतमोजणी सुरु असतानाच सुनेत्रा पवार यांनी सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर केली आहे. आज बारामती विधानसभा पोटनिवडणुकीचा निकाल जाहीर होत असताना आपण सर्वांनी आपल्या मतांमधून दाखवलेला विश्वास मी आदरणीय अजितदादांच्या पवित्र स्मृतींना समर्पित करते. आजचा हा निकाल जाहीर होत असताना आदरणीय दादांच्या आठवणींना उजाळा मिळाल्याने आपण सर्वजण भावूक आहोत. दादांवर जीवापाड प्रेम करणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांना नम्र विनंती आहे की, या विजयाचा जल्लोष म्हणून कुणीही मिरवणुका काढू नयेत किंवा गुलाल उधळू नये. आपण संयम राखूया आणि दादांच्या विचारांना साजेसे वर्तन करूया.

पुढे त्या म्हणाल्या, दादांच्या स्वप्नातील बारामती घडवण्याची संधी मला दिल्याबद्दल मी सर्व बारामतीकरांचे मनःपूर्वक आभार मानते. हा शेवट नाही, ही तर फक्त सुरुवात आहे. निर्धाराची, संघर्षाची आणि नव्या बारामतीची! सुनेत्रा पवार या विक्रमी मतांनी विजयी होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

भाजप आमदार शिवाजी कर्डिले यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाल्यामुळे रिक्त झालेल्या जागेसाठी राहुरीत पोटनिवडणूक झाली. भाजपकडून उमेदवारी मिळालेले शिवाजी कर्डिले यांचे पुत्र अक्षय कर्डिले यांच्या विजयाचा विश्वास समर्थकांनी व्यक्त केला आहे. राहुरीत मतमोजणीमध्ये २७ फेऱ्या होणार आहेत. दुपारपर्यंत संपूर्ण निकाल हाती येण्याचा अंदाज आहे.

अक्षय कर्डिले यांच्याविरोधात शरद पवार पक्षाचे गोविंद मोकाटे, वंचित आघाडीचे संतोष चोळके व अपक्ष रावसाहेब खेवरे हे निवडणुकीच्या रिंगणात आहेत. अक्षय कर्डिले हे विक्रमी मताधिक्क्यांनी विजयी होण्याची शक्यता आहे.

## पश्चिम बंगाल, तामिळनाडू, केरळात सत्तांतराचे संकेत; आसाम भाजप राखणार, पुद्दुचेरीत एआयएनआरसीची आघाडी

**नवी दिल्ली (भ्रमर वृत्तसेवा) :- चार राज्यांसह एका केंद्र शासित प्रदेशामध्ये होत असलेल्या विधानसभा निवडणुकीच्या निकालांनी देशाचे लक्ष वेधून घेतले आहे. विशेषतः पश्चिम बंगाल, तामिळनाडू आणि केरळात सत्तांतर होण्याचे संकेत मिळत आहेत. निवडणूक आयोगाने सुरुवातीच्या मतमोजणी फेऱ्या पूर्ण पडल्यानंतर कलांचे आकडे जाहीर केले आहेत. यात पश्चिम बंगालमध्ये भाजपा, तर तामिळनाडूमध्ये टीव्हीकेने मुसंडी मारली आहे.**

सत्तेत असलेल्या ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसला झटका बसण्याचे संकेत मिळत आहेत. मतमोजणीच्या कलानुसार पश्चिम बंगालमध्ये भाजपाने आघाडी घेतली आहे. भाजपा ४६ जागांवर, तृणमूल काँग्रेस २४ जागा, तर बीजीपीएम आणि एजेयूपी प्रत्येकी एका जागेवर आघाडीवर आहे. पश्चिम बंगालमध्ये बहुमतासाठी १४७ जागा आवश्यक आहेत.

दक्षिणेतील एक महत्त्वाचे राज्य असलेल्या तामिळनाडूमध्ये अभिनेता विजयच्या टीव्हीएमके पक्षाने मोठी मुसंडी मारली आहे. निवडणूक आयोगाच्या माहितीनुसार, टीव्हीके७१ जागांवर आघाडीवर आहे. त्यापाठोपाठ अण्णाद्रमुक ५२, तर द्रमुक २९ जागांवर आघाडीवर आहे. पीएमके ३ जागा आणि काँग्रेसने ५ जागांवर आघाडी घेतली आहे. तामिळनाडूमध्ये बहुमताचा आकडा ११८ असून, या कलानुसार तामिळनाडूमध्येही सत्तांतराची चिन्हे दिसत आहेत.

केरळमध्ये संयुक्त लोकशाही आघाडी आणि डावी लोकशाही आघाडी या दोन गटांमध्येच थेट लढत होत असलेल्या केरळमध्ये सत्तांतर होताना दिसत आहे. केरळमध्ये काँग्रेसने ५२ जागांवर आघाडी घेतली आहे. तर कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (मार्क्सवादी) ३१ जागांवर आघाडीवर आहे. आययूएमएल २० जागांवर, सीपीआय १३ जागा, तर केईसी ५ जागांवर आघाडीवर आहे. केरळात बहुमतासाठी ७१ जागा आवश्यक आहेत.

आसाममध्ये यावेळी सत्तांतर होणार का? याकडे लक्ष होते; पण सुरुवातीच्या कलांमध्ये भाजपा सत्ता राखणार असल्याचे दिसत आहे. भाजपाने ६८ जागांवर आघाडी घेतली आहे. काँग्रेसने २० जागांवर, तर बीओपीई ८, आसाम गण परिषद ७ जागांवर आघाडीवर आहे. आसाममध्ये बहुमताचा आकडा ६४ इतका आहे.

पद्दुचेरी या केंद्रशासित प्रदेशात एआयएनआरसी पक्षाने ८ जागांवर आघाडी घेतली असून, आयएनडी ३ जागा, काँग्रेस २ जागा, तर भाजपा आणि अण्णाद्रमुक प्रत्येकी एका जागेवर आघाडीवर आहेत. इथे भाजपा प्रणित आघाडीलाच सत्ता मिळताना दिसत आहे. पद्दुचेरीमध्ये बहुमताचा आकडा १६ इतका आहे.

पश्चिम बंगाल विधानसभा निवडणूक निकालात आत्तापर्यंतच्या कलांनुसार, भाजपाने स्पष्ट बहुमताचा आकडा गाठला आहे. सुरुवातीला काही फेऱ्यांमध्ये भाजपा आणि तृणमूलमध्ये 'काँटेकी टक्कर' पाहायला मिळाली. पण, हळूहळू भाजपाने ऐतिहासिक विजयाच्या दिशेने कूच करत, १५० जागांचा आकडा गाठला आहे. तृणमूल काँग्रेस आत्ताच्या घडीला ९२ जागांवर आघाडीवर आहे.

तामिळनाडूमध्ये अभिनेता विजय थलापती यांची जादू पाहायला मिळत आहे. सुरुवातीच्या कलांमध्ये विजय यांचा पक्ष टीव्हीके ७५ जागांवर आघाडीवर आहे. डीएमके याठिकाणी ६७ जागांवर पुढे आहे. एआयडीएमकेही ३५ जागांवर आघाडीवर आहे. तामिळनाडूत सध्या डीएमके यांची सत्ता आहे. त्यांनी यंदा काँग्रेस आणि अन्य पक्षांसोबत आघाडी करून निवडणूक लढवली आहे. परंतु अभिनेता विजय यांच्या टीवीके पक्षाने डीएमकेला घाम फोडला आहे.

केरळच्या निकालाबाबत आम्ही पूर्ण आशावादी आहोत. नक्कीच आमचा विजय होईल. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये जे निकाल लागले त्याचीच पुनरावृत्ती यावेळीही होईल. जागांच्या संख्येबाबत आता अंदाज लावू शकत नाही. मात्र आमच्या विजयाची खात्री आहे, असा विश्वास केरळ काँग्रेस प्रदेशाध्यक्ष सनी जोसेफ यांनी व्यक्त केला. केरळमध्ये मोठा उलटफेर पाहायला मिळत आहे. १४० जागांच्या निकालात काँग्रेसच्या नेतृत्वाखालील युनायटेड डेमोक्रॅटिक फ्रंट ९८ जागांवर आघाडीवर आहे. सत्ताधारी डाव्या आघाडीलाकेवळ ३८ जागांवर समाधान मानावे लागत आहे. केरळच्या जनतेने दर पाच वर्षांनी सत्ता बदलण्याची आपली परंपरा कायम ठेवल्याचे दिसत आहे.

आसाममध्ये भाजप आघाडीवर दिसत आहे. सध्याच्या कलांनुसार, आसाममध्ये भाजप सर्वाधिक जागांवर आघाडीवर आहे. अशीच परिस्थिती राहिली तर भाजप इथे तिसऱ्यांचा आसाममध्ये सरकार स्थापन करण्याची शक्यता आहे.

## लग्नाचे आमिष दाखवून तरूणीवर दोन वर्षे लैंगिक अत्याचार

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** लग्नाचे आमिष दाखवून तरूणीवर लैंगिक अत्याचार करुन नंतर दुसऱ्या मुलीशी संबंध ठेवून पहिल्या तरुणीला लग्नास नकार देणाऱ्या तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यता आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, आरोपी प्रफुल्ल वसंत काळे (वय २९, रा. राजवाडा, द्वारका, नाशिक) याने पिडीत तरुणीला दि.१४ एप्रिल २०२४ ते ३ मे २०२६ या कालावधीत लग्नाचे आमिष दाखवून तिचा विश्वास संपादन केला. दोन वर्ष पिडीत तरुणीला अशोकनगर, सातपूर यासह विविध हॉटेल, लॉजमध्ये नेऊन तिच्या इच्छेविरुद्ध बळजबरीने शारिरीक संबंध प्रस्थापित केले. नंतर आरोपी काळे याने दुसऱ्या मुलीशी मैत्री करुन तिच्यासोबतही लैंगिक संबंध प्रस्थापित केले.

पिडीत तरुणाला बाजूला करण्यासाठी आरोपीने तिला मारहाण, शिवीगाळ, धमकी देऊन लग्नास नकार देऊन पिडीतेची फसवणूक केली. याप्रकरणी सातपूर पोलीस ठाण्यात प्रफुल्ल काळेविरुद्ध बलात्कारासह फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक नळकांडे करीत आहे.

## फेसबुक फ्रेंडने महिलेवर लैंगिक अत्याचार करुन उकळली खंडणी

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** महिलेला गुंगीकारक पाणी पाजून हॉटेलमध्ये लैंगिक अत्याचार करुन तिचे अश्लिल फोटो काढून ते व्हायरल करण्याची धमकी देऊन खंडणी उकळणाऱ्या नामपूरच्या इसमाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, फिर्यादी महिला ही ३५ वर्षीय असून, ती नाशिकमध्ये रहाते. आरोपी निलेश अशोक पगार (वय ३०, रा. उतराणे, नामपूर, ता. सटाणा) याने फेसबुक वरुन पिडीत महिलेशी ओळख निर्माण केली. दि. २६ मार्च २०२० रोजी सकाळी १० वाजेच्या सुमारास पिडीतेला पंचवटीतील गोदाघाट परिसरात बोलावले. त्यावेळी आरोपीने पिडीतेला गुंगीकारक पाणी पाजले. त्यामुळे तिला चक्कर आली म्हणून आरोपीने जवळच असलेल्या हॉटेलमध्ये नेले. तेथे सकाळी साडेदहा ते साडेबारा असे दोन तास घावले. त्यावेळी फिर्यादी शुद्धीवर आल्यानंतर दोघे आपापल्या घरी निघून गेले. त्याच दिवशी सायंकाळी आरोपी पगार याने पिडीतेला फोन केला. आणि म्हणाला, 'आपण हॉटेलमध्ये असताना मी आपले काही निर्वस्त्र फोटो व व्हिडिओ काढलेले आहेत. ते सर्व मी सोशल मिडियावर व्हायरल करुन तुझी बदनामी करतो,' असे म्हणाला. त्यानंतर फिर्यादीकडून २६ मार्च २०२० ते ३ मे २०२६ या कालावधीत पगार याने पिडितेकडून वेळोवेळी चेकद्वारे, ऑनलाईन व रोख स्वरुपात रक्कम वसूल करुन खंडणीस्वरुपात स्वीकारली आहे.

वारंवार होणाऱ्या या त्रासाला कंटाळून अखेर पिडीत महिलेने पंचवटी पोलीस ठाण्यात निलेश पगारविरुद्ध बलात्कार व खंडणीची तक्रार दिली असून, पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सोनवणे करीत आहे.

## वृद्धेचे साडेचार तोळ्यांचे मंगळसूत्र बळजबरीने खेचले

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** लग्नासाठी आलेल्या वृद्धेच्या गळ्यातील साडेचार तोळ्याचे मंगळसूत्र मोटारसायकलवरुन आलेल्या चोरट्यांनी बळजबरीने खेचून नेल्याची घटना भगूर येथे घडली.

फिर्यादी उषा विष्णू मोजाड (वय ६५, रा. मुक्ता फार्म, भगूर, ता.जि. नाशिक) या काल (दि.३) सायं. ५ वाजेच्या सुमारास राहुरी फाटा येथे असलेल्या रुक्मिणी लॉन्स येथे आल्या होत्या. फिर्यादी या रस्त्याने जात असताना दुचाकीवरुन आलेल्या दोन हेल्मेटधारी अनोळखी इसमांनी मोजाड यांच्या गळ्यातील साडेचार तोळे वजनाचे ३ लाख २० हजार रुपये किंमतीचे सोन्याचे मंगळसूत्र बळजबरीने ओढून चोरुन नेले. याप्रकरणी देवळाली कॅम्प पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस हवालदार सिद्धपुरे करीत आहे.

## नाशिकला ६ मे रोजी कुंभ उद्योग संगमसह डिस्ट्रिक्ट इन्व्हेस्टमेंट समिट

**नाशिक (जिमाका) :-** नाशिक त्र्यंबकेश्वर येथे पुढील वर्षी होणाऱ्या कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिक जिल्ह्यातील उद्योग, व्यवसायाला चालना देण्यासाठी हॉटेल ताज, नाशिक येथे ६ मे रोजी सकाळी ९.३० ते दुपारी ३.३० या वेळेत कुंभ उद्योग संगम आणि नाशिक डिस्ट्रिक्ट इन्व्हेस्टमेंट समिट होणार आहे, अशी माहिती उद्योग विकास आयुक्त दीपेंद्रसिंह कुशवाह यांनी दिली.



जिल्हाधिकारी कार्यालयातील मध्यवर्ती सभागृहात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा विकास प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंह, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त अमित रंजन, प्राधिकरणाचे अतिरिक्त आयुक्त कमलाकर रणदिवे आदी उपस्थित होते.

कुशवाह यांनी सांगितले की, राज्यात गुंतवणूक, उद्योग वाढीसाठी विविध प्रयत्न करीत आहेत. या प्रयत्नांचाच एक भाग म्हणून हा उपक्रम राबविण्यात येत आहे. नाशिक त्र्यंबकेश्वर येथे पुढील वर्षी कुंभमेळा होत आहे. यात उद्योग, व्यावसायिकांना वेगवेगळ्या माध्यमातून सहभागी करून घेण्यात येईल. कुंभमेळ्यात उद्योगांचे नेहमीच योगदान राहिले आहे. हरित नाशिक, स्वच्छ नाशिकसह विविध उपक्रमांना उद्योगांचे सहकार्य राहिले आहे. आगामी कुंभमेळ्यात ही त्यांचे योगदान मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. उद्योग, व्यावसायिकांना नाशिकमध्ये गुंतवणुकीसाठी प्रोत्साहन देण्यात येत आहे. नाशिकमध्ये उपलब्ध पायाभूत सोयीसुविधा, दळणवळणाची साधने, महामार्ग यामुळे गुंतवणूकदार या भागाकडे आकर्षित होत आहेत. आतापर्यंत झालेले सामंजस्य करारातून विविध उद्योग, व्यवसाय उभारणीचे काम प्रगतीपथावर आहे.

या समिटमध्ये सहभागी होण्यासाठी उद्योजक, व्यावसायिक, उद्योजकांच्या विविध संघटना यांच्याशी संवाद सुरू आहे. त्यांनीही (पान ६ वर)

## जेलरोडवर गॅस रिफिलिंगचा काळाबाजार उद्ध्वस्थ

**नाशिकरोड (भ्रमर प्रतिनिधी) :-** उपनगर पोलिसांनी जेलरोड परिसरातील भीमनगरमध्ये छापा टाकून घरगुती व व्यावसायिक गॅस सिलिंडरमधून अवैधरित्या रिक्षात गॅस भरणाऱ्या रॅकेटचा पर्दाफाश केला आहे. या कारवाईत पिस्टन मोटारसह ३९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून एका संशयिताला बेड्या ठोकण्यात आल्या आहेत.



उपनगर पोलीस ठाण्याचे गुन्हे शोध पथक गस्तीवर असताना पोलीस अंमलदार संदेश रघतवान यांना गुप्त माहिती मिळाली. जेलरोडवरील भीमनगर येथील एका पत्राच्या शेडमध्ये पिस्टन मोटारच्या सहाय्याने गॅसची चोरी करून तो रिक्षांमध्ये भरला जात असल्याची खात्री पटताच पोलिसांनी सापळा रचला.

भीमनगरमधील 'यश जनरल स्टोअर' नावाच्या पत्राच्या शेडजवळ पोलीस पथक पोहोचताच एक इसम संशयास्पदरीत्या हालचाल करताना दिसला. पोलिसांची चाहूल लागताच त्याने पळ काढण्याचा प्रयत्न केला, मात्र पथकाने पाठलाग करून त्याला झडप घालून पकडले. अतुल बाळासाहेब पवार (वय ४१, रा. भीमनगर सोसायटी, जेलरोड) असे ताब्यात घेतलेल्या संशयिताचे नाव आहे.

पोलिसांनी पंचांसमक्ष शेडची झडती घेतली असता, त्या ठिकाणी गॅस रिफिलिंगचे मोठे रॅकेट समोर आले. घटनास्थळावरून १० हजार रुपये किमतीचे एचपी कंपनीचे ४ सिलिंडर, भारत गॅसचे ५ हजार रुपये किंमतीचे २ व्यावसायिक सिलिंडर, २ हजार रुपये किमतीचा १ एचपी गॅस घरगुती सिलिंडर, २० हजार रुपयांची पिस्टन मोटार आणि २ हजार रुपयांचा इलेक्ट्रॉनिक काटा असा एकूण ३९ हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला आहे. याप्रकरणी उपनगर पोलीस ठाण्यात अत्यावश्यक वस्तू अधिनियम व भारतीय न्याय संहिता कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कामगिरी वरिष्ठ निरीक्षक जयंत शिरसाठ, पोलीस निरीक्षक (गुन्हे) संजीव फुलपगारे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक प्रभाकर सोनवणे व पथकातील संदेश रघतवान, योगेश जाधव, मिलिंद बागूल, सुनील गायकवाड, सूरज गवळी, पंकज कर्पे आणि सतीश मडवई यांनी केली आहे.

## मुख्य संशयित निदा खानचा अटकपूर्व जामीन फेटाळला
### नाशिकरोड न्यायालयाचा दणका; एसआयटीकडून अटकेची शक्यता

**नाशिकरोड (भ्रमर प्रतिनिधी) :-** देशभरात खळबळ उडवून देणाऱ्या टीसीएस कंपनीतील लैंगिक अत्याचार आणि अ‍ॅट्रॉसिटी प्रकरणात गेल्या अनेक दिवसांपासून फरार असलेली मुख्य संशयित निदा खान हिला नाशिकरोड न्यायालयाने मोठा दणका दिला आहे.

निदा खानने दाखल केलेला अंतरिम अटकपूर्व जामीन अर्ज जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश केदार जोशी यांनी फेटाळून लावला आहे. या निर्णयामुळे निदा खानच्या अटकेचा मार्ग मोकळा झाला असून, विशेष तपास पथकाच्या हालचालींना वेग आला आहे.

देवळाली कॅम्प पोलीस ठाण्यात टीसीएस कंपनीतील महिला कर्मचाऱ्याचे लैंगिक शोषण आणि अ‍ॅट्रॉसिटी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणात दानिश शेख आणि तौसिफ अख्तर हे मुख्य आरोपी असून ते सध्या न्यायालयीन कोठडीत आहेत. मात्र, या संपूर्ण प्रकरणात त्यांना मदत करणारी आणि गुन्ह्यात सहभाग असलेली निदा खान ही गुन्हा दाखल झाल्यापासून फरार आहे. तिने अटकेपासून वाचण्यासाठी २० एप्रिल रोजी नाशिकरोड न्यायालयात अटकपूर्व जामिनासाठी अर्ज केला होता.

शुक्रवारी या अर्जावर न्यायाधीश केदार जोशी यांच्यासमोर सुनावणी झाली. निदा खानच्या वतीने अ‍ॅड. राहुल कासलीवाल यांनी युक्तिवाद करत अंतरिम जामिनाची मागणी केली. मात्र, विशेष सरकारी वकील अजय मिसर यांनी याला तीव्र विरोध दर्शवला. पीडितेवर झालेला अत्याचार, धर्मांतराचा दबाव आणि या कटात निदा खानची असलेली भूमिका पाहता तिला जामीन देऊ नये, असा दावा सरकारी पक्षातर्फे करण्यात आला. पीडितेच्या वतीने अ‍ॅड. मिलिंद कुरकुटे, अ‍ॅड. भूषण बाजपेयी, अ‍ॅड. नितीन पंडित, अ‍ॅड. योगेश शिरसाठ, अ‍ॅड. ऋषिकेश कातकडे, अ‍ॅड. ऋषी बलकवडे आणि अ‍ॅड. आदित्य डावखर या फौजफाट्याने बाजू मांडली होती.

न्यायालयाने दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर निदा खानचा जामीन अर्ज फेटाळून लावला. ती गेल्या अनेक दिवसांपासून पोलिसांना गुंगारा देत आहे. जामीन फेटाळल्याने आता पोलिसांच्या विशेष पथकाकडून निदा खानला कोणत्याही क्षणी अटक केली जाऊ शकते.

सस्नेह निमंत्रण
५३ वा वर्धापन दिन
भ्रमर
सस्नेह नमस्कार,
आपल्यासारख्या वाचकांच्या आणि हितचिंतकांच्या आशीर्वादाने
दैनिक भ्रमर
यंदा ५४ व्या वर्षात पदार्पण करीत आहे.
५३ व्या वर्धापन दिनानिमित्त
श्री सत्यनारायण पूजन
आयोजित करण्यात आले आहे. मित्र परिवारासह
तीर्थप्रसादास उपस्थित रहावे, ही आग्रहाची विनंती.
मंगळवार दि. ५ मे २०२६ रोजी सायम् ६ ते रात्री ९ पर्यंत.
स्थळ : दै. भ्रमर कार्यालय, सीताराम चेंबर्स, पेठ फाटा, पंचवटी, नाशिक-३.
आपले नम्र
चंदुलाल शाह संपादक, दै. भ्रमर
अ‍ॅड. चैतन्य शाह हितेश शाह
भ्रमर परिवार, नाशिक
कृपया पुष्पगुच्छ व भेटवस्तू आणू नये.




## राशीभविष्य

- **मेष** : कामाचं योग्य मोल मिळेल. उत्साह वाढेल. विद्यार्थ्यांना प्रगतीच्या नव्या संधी लाभतील.
- **वृषभ** : प्रयत्नातील सातत्य कामी येईल. आर्थिक बाबतीत दिलासा मिळेल. प्रियजनांचा सहवास लाभेल.
- **मिथुन** : कामानिमित्त प्रवास होईल. विवाहाबाबत तडजोडीचं धोरण ठेवावं. अचानक धनलाभ संभवतो.
- **कर्क** : अपेक्षित वार्ता कानी येईल. विद्युत उपकरणं व्यवस्थित हाताळावी. बोलण्यातून गैरसमज संभवतात.
- **सिंह** : जुनी येणी सहज वसूल होतील. प्रेम प्रकरणात मतभेद संभवतात. नोकरीत बढतीचे योग आहेत.
- **कन्या** : इतरांच्या प्रश्नात हस्तक्षेप करू नका. आपल्या कार्यावर लक्ष केंद्रित करा. विचारानं रहावं.
- **तूळ** : नोकरीच्या प्रयत्नांना अनुकूलता राहील. उष्णतेचे विकार संभवतात. कामासाठी धावपळ होईल.
- **वृश्चिक** : महत्त्वाचे निर्णय विचारपूर्वक घ्यावेत. चैनीवर खर्च होईल. स्थावर प्रश्नांमध्ये समाधान लाभेल.
- **धनु** : उपजत कला-गुणांचा विकास होईल. घरगुती प्रश्नातून मार्ग निघेल. वाहन जपून चालवायला हवं.
- **मकर** : मित्र-नातलगांच्या भेटी होतील. कामाचा ताण वाढेल. यांत्रिक-तांत्रिक क्षेत्रात संधी लाभतील.
- **कुंभ** : अनपेक्षित घटनांनी सुखद धक्का मिळेल. छोटा-मोठा प्रवास घडेल. आनंदी, समाधानी रहाल.
- **मीन** : विवाहेच्छुकांना दिलासा मिळेल. विद्यार्थ्यांना अडचणी येतील. थोरामोठ्यांचा सहवास लाभेल.

## ४ मे

दिनविशेष

**१९८०** : मराठीतील विख्यात साहित्यिक प्रा. अनंत काणेकर यांचे निधन.
**२०१५** : फेसबुकतर्फे भारतात'इंटरनेट.ओरजी'ही योजना सुरू करण्यात आली.
**२०१७** : कोलकाता उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती सी.एस.कर्नन यांनी स्वत:ची वैद्यकीय तपासणी करू देण्यास नकार दिला.
**२०१८** : यंदा साहित्य क्षेत्रासाठी प्रतिष्ठेचा नोबेल पुरस्कार कोणालाही देण्यात येणार नसल्याचं जाहीर करण्यात आलं.

## आरोग्यमंत्र — हृदयविकाराचा धोका

हृदयविकाराचा झटका येणे अर्थात हार्ट अटॅकचे प्रमाण आज सर्वच वयोगटातील लोकांमध्ये वाढलेले आहे. बदललेली जीवनशैली, व्यायामाचा अभाव, चुकीचा आहार, मानसिक तणाव अशा अनेक कारणांमुळे आज अगदी वयाच्या तिशीमध्येही हार्ट अटॅक आलेला दिसत आहे. त्यामुळे सर्वांनीच हार्ट अटॅक विषयी माहिती जाणून घेऊन त्यापासून दूर राहण्यासाठी योग्य ती काळजी घेणे आवश्यक बनले आहे. यामध्ये हार्ट अटॅक कोणास येऊ शकतो याचाही विचार करायला हवा. तज्ज्ञांच्या मते, वयाच्या २५ वर्षानंतरच्या व्यक्ती, लठ्ठपणा, मधुमेहाचे रुग्ण, धमनीकाठिन्यता, हाय ब्लडप्रेशर, हाय ब्लड कोलेस्टेरॉल, मानसिक तणाव या समस्या असणाऱ्या लोकांना हृदयविकाराचा धोका अधिक असतो. त्याचबरोबर या विकाराची अनुवंशिकता असणे, कुटुंबातील आजोबा, आजी, आई, वडील, भाऊ किंवा बहीण यापैकी कोणाला हार्ट अटॅक आलेला असल्यास त्या कुटुंबातील पुढील पिढीला हार्ट अटॅकचा धोका असतो. खेरीज धुम्रपान, मद्यपान, तंबाखू, अमली पदार्थ इत्यादीच्या व्यसनाधीन व्यक्तींमध्ये हृदयविकाराचा झटका येण्याचा धोका अधिक असतो. प्रामुख्याने बदललेली जीवनशैली, व्यायामाचा अभाव, धकाधकीचे जीवन, मानसिक ताणतणाव आणि अयोग्य आहारामुळे सध्या हा जीवघेणा आजार पंचविशीपासूनच अनेकांमध्ये आढळत आहे. त्यातही धमनीकाठीण्यता हे हृद्यविकाराचे प्रमुख कारण बनले आहे. हे लक्षात घेता काळजी घ्यावी.



## स्मार्ट टॉक — शिकण्याचा हटके अनुभव

ही साईट कायम अपडेट होत असते. नवनवे गेम्स ॲड होत असतात. लिटरेचर गेम्स, शॉर्ट व्हॉव्हेल गेम्स, कंपाउंड वर्ड लेसन, सिलॅबस लेसन, ॲनॉलॉजी लेसन असं बरंच काही यावर आहे.

या साईटला भेट देऊन तुम्ही विविध विभाग धुंडाळू शकता. तुमच्या लहान भावंडांनाही शिकवू शकता. इंग्रजी सुधारण्यासाठी लॅंग्वेजशी संबंधित गेम्स उपयुक्त ठरू शकतील. टायपिंग शिकायचं असेल तर तेही या साईटवर उपलब्ध आहे. टायपिंग लेसन या विभागात जाऊन तुम्ही याबाबतचे धडे घेऊ शकता. आरोग्याविषयी, शरीराविषयी जाणून घ्यायचं असेल तर हेल्थ गेम्सचा सेक्शन आहे. विविध प्रकारच्या ॲलर्जीपासून फिटनेसपर्यंतचं बरंच काही गेम्सच्या माध्यमातून झटपट समजून घेता येईल. यामुळे तुमचं ज्ञान वाढेल. स्पेलिंग येत नसतील तर स्पेलिंग गेम्स खेळा. यंदाच्या सुटीत या साईटला भेट द्या. तुमची कौशल्यं वाढवा आणि नव्या वर्गात गेल्यावर या कौशल्यांचा वापर करून भरपूर प्रगती करा.

## ब्युटी टॉक — हर्बल बाथ घ्या, रिलॅक्स व्हा

✻ कॅलेंड्युलाच्या फुलांमध्ये औषधी गुणधर्म असतात. यामुळे त्वचा उजळ दिसते. शिवाय त्वचेतल्या पेशींची दुरूस्ती करण्याचं कामही ही फुलं करतात. यामुळे त्वचेवरचं पुरळ कमी होतं आणि त्वचेतला ओलावाही टिकून रहातो. कॅलेंड्युला आणि गुलाबाची वाळलेली फुलं घ्या.यात लवेंडर तेलाचे काही थेंब घाला. हे सर्व मलमलच्या पाउचमध्ये भरून ते बादलीत ठेवा. यामुळे त्वचेचं छान पोषण होईल.

✻ कॅमोमाईलच्या फुलांना फ्रुटी सुगंध असतो. या सुगंधामुळे तुम्हाला ताजंतवानं वाटतं. हर्बल बाथसाठी कॅमोमाईलची फुलं पाण्यात दहा मिनिटं उकळवा. यामुळे यातलं गुणकारी तेल बाहेर पडेल. हे पाणी आंघोळीच्या पाण्यात घाला.

✻ तुळशीची पानं आंघोळीच्या पाण्यात घातल्याने तुम्हाला ताजंतवानं वाटेल. हा झटपट होणारा हर्बल बाथ आहे.

## पंचांग

**सोमवार, ४ मे २०२६**
पराभवनाम संवत्सर शके १९४८, वैशाख कृ ३, चंद्रराशी : वृश्चिक, नक्षत्र : अनुराधा, योग : परिघ, सूर्योदय ६.११, सूर्यास्त ७.००

## फॉरवर्ड्स

**कैसें कह दें क़ी उसे क़ोई ख़बर नहीं...**

**हर ज़र्रा क़ायनात उसकीं नज़र में हैं...!**

## फिटनेस फंडा

✻ सामना सुरू होण्याच्या थोडं आधी म्हणजे ६.३० वाजता. गुळ-तूप पोळी किंवा ओवा घातलेला पराठा खा. त्यावर थोडं बटर घाला. सोबत केळंही खाता येईल. यामुळे तुम्हाला लवकर भूक लागणार नाही.

✻ ८.३० ते ९ या वेळात जेवण करा. जेवणात दही आणि खिचडी, आमटी भात, अंड्याची करी भात, सांबार भात किंवा मासे खा.

✻ सोफ्यावर जास्त वेळ बसून राहू नका. स्ट्रॅटेजिक टाईम आउट, ड्रिंक्स किंवा ओव्हरच्यामध्ये थोडा वेळ उठून हालचाल करा. मेंदू आणि डोळ्यांना थोडा आराम द्या. **(क्रमश:)**

## युवाविश्व — इलेक्ट्रिक शेव्हर वापरताय?

मित्रांनो, इलेक्ट्रिक शेव्हरचा वापर खूप सोपा आहे पण त्याचा वापर करताना काही गोष्टी लक्षात घ्यायला हव्यात. आज त्याचीच माहिती घेऊ या.

✻ शेव्हिंग करण्याआधी दाढीचे केस स्वच्छ करून घ्या. इलेक्ट्रिक शेव्हरचा योग्य उपयोग करायचा असेल तर दाढीचे केस सरळ आणि कोरडे असायला हवेत. ✻ दाढीच्या केसांना तेल लावू नका. त्याऐवजी इलेक्ट्रिक बेस्ड प्री इलेक्ट्रिक शेव प्रोडक्टचा वापर करता येईल. ✻ व्हिटॅमिन ई युक्त उत्पादनांमुळे त्वचेची जळजळ, अस्वस्थता कमी होते. त्यामुळे अशा उत्पादनांचा वापर करता येईल. ✻ इलेक्ट्रिक शेव्हरला चेहऱ्यावर फिरवताना योग्य दिशा पकडा. यावेळी त्वचा घट्ट ठेवण्याचा प्रयत्न करा. त्यामुळे शेव्हिंग करताना दुसऱ्या हाताने त्वचा ताणून धरा. ✻ त्वचा ताणून धरल्याने शेव्हरचा त्वचेशी अधिक चांगल्या प्रकारे संपर्क होईल. यामुळे शेव्हिंगचा चांगला अनुभव मिळू शकेल. ✻ शेव्हरची योग्य काळजी घ्यायला हवी. त्यामुळे तो अधिक चांगल्या प्रकारे काम करू शकेल. शेव्हरसोबतच्या क्लिनिंग सिस्टिमचाही वापर करता येईल. ✻ वेळोवेळी शेव्हरची धूळ स्वच्छ करा. हे करताना काळजी घ्या.



## खेचाखेची — बघून चाला

एक बाई देवाघरी गेल्या. घरुन अंत्ययात्रा सुरु झाली. काही अंतर गेल्यावर खांदा देणाऱ्या एकाला ठेच लागली आणि तो पडला. इतर तिघांचा तोल जाऊन तिरडी खाली पडली. तिरडी खाली पडताच बाई उठुन बसल्या आणि चांगल्या दहा वर्षे जगल्या. दहा वर्षांनी परत बाईंची अंत्ययात्रा सुरु झाली.

थोड्या वेळात बाईचा नवरा खांदा देणाऱ्यांना सांगू लागला, 'बघून चाला हं. नाहीतर कोणाला तरी परत ठेच लागेल.'

## वेगळं काही


अबुधाबीमध्ये फक्त गरूडांसाठीचं रुग्णालय बांधण्यात आलं. इथे आजारी गरुडांच्या देखरेखीसोबतच त्यांच्यावर शस्त्रक्रियाही केली जाते. या रुग्णालयात सर्व अत्याधुनिक सोयी-सुविधा उपलब्ध आहेत. गरुडांसाठी वेटिंग रूम, आपत्कालीन वैद्यकीय विभाग आणि ऑपरेशन थिएटरही आहे. अरब देशांमध्ये गरुड पाळणं हे श्रीमंतीचं लक्षण मानलं जात असल्याने बरेच शेख हा पक्षी पाळतात. त्यामुळे खास गरुडांना वाहिलेलं रुग्णालय इथे बांधण्यात आलं. फाल्कन असं या रुग्णालयाचं नाव आहे. या रुग्णालयाला सरकारकडून आर्थिक मदत मिळते. इथे गरुडांवर संशोधनही केलं जातं. माफक दरात या पक्ष्यांवर उपचार केले जातात. इथे गरुडांना प्रशिक्षणही दिलं जातं.

## माय स्पेस — नियोजनावर भर द्या

तणाव हे सध्याच्या कार्यशैलीचं बायप्रोडक्ट आहे असं म्हटल्यास चुकीचं ठरणार नाही. पण म्हणून तणावाकडे दुर्लक्ष करुनही चालणार नाही. कारण तसं केल्यास याचं रुपांतर क्रॉनिक तणावात होण्याची शक्यता असते. म्हणूनच कामाचा अतिताण जाणवत असेल तर काही बाबी लक्षात घ्याव्या. पहिली बाब म्हणजे कामाबद्दल अतिविचार करण्यापेक्षा योग्य नियोजनावर भर द्यावा. काही वेळासाठी ब्रेक घेणंही उत्तम ठरतं. या काळात स्वत:साठी वेळ द्या. वेळेत काम संपवण्यात नेमक्या कोणत्या अडचणी येतात याची नोंद घ्या. कामाचा प्राधान्यक्रम ठरवताना गफलत होत नसल्याची खात्री करा. कोणत्या कामाला किती वेळ पुरेसा आहे, याचा अंदाजही तुम्ही घेऊ शकता. यासाठी ऑफिसमध्ये गेल्यानंतर आज किती कामं उरकायची आहेत याचा अंदाज घ्या. त्यानंतर नियोजनाप्रमाणे काम संपवण्यास सुरुवात करा. काम सुरु करताना वेळ कुठे वाया जातो हे तपासून बघा. कामाला उशीरा सुरुवात करणं, सोशल मीडियावर वेळ घालवणं, सहकाऱ्यांशी गप्पा मारणं हे तुमच्या कामातील कच्चे दुवे असू शकतात. काही प्रमाणात या सर्व बाबी गरजेच्या असल्या तरी यासाठी विशिष्ट वेळेची मर्यादा असणं गरजेचं असतं.




# शब्दकोडे क्रमांक २२१०



**आडवे शब्द :-**
१) उपयोग, वापर
४) प्रेत
६) पडदा
९) मा.विनायक यांची अभिनेत्री मुलगी बेबी ✻✻.
१०) च्या पाशी
११) दक्ष
१२) बोऱ्या वाजणे ह्या वा.प्र.मधील पूर्वार्ध ✻✻ ✻✻ नऊ बारा
१४) पदार्थाची थंडपणा किंवा उष्णतामानाची स्थिती
१६) पोक, वक्रता
१७) लहान
१८) नृत्यकलेचे दैवत
२०) उपवासाचे तांदूळ
२१) एक प्रकारचा अंगरखा
२४) गुरांचा घोळका
२५) गवताची जमीन
२६) सहा
२७) कणीदार
२९) त्रासलेला
३१) गाडीचे छत
३३) पृथ्वी
३५) पावसाची वाट पाहणारा पक्षी
३७)छाती
३९) बडबड
४०) चिंतन
४२) चलनवलन
४४) हाताचा तळवा
४७) लोटी
४८) मीठ
५१) होडी
५२) पौराणिक अश्ववाहन
५४) लोक
५५) शाहीराजवळचे चर्मवाद्य
५६) तारुन न्या किंवा मारुन टाका ह्या अर्थाचा वा,प्र.
५९) मऊच्या विरुद्ध
६०) स्वत:बद्दलचा उल्लेख करण्याचा शब्द
६३) समोरासमोरची लढत
६५) गावठी, अस्सल
६६) नसता संबंध जोडणे (वा.प्र.).

**उभे शब्द :-**
१) पत्रातील वि.वि
२) कमीतकमी
३) अबोली फुलाची माळ
४) जाणता अजाणता
५) अखबार
६) बहुतांशी, शेजारी शेजारी
७) खून
८) एक आदिवासी जमात
१३) परवाच्या नंतरचा दिवस
१५) अभिनेता
१६) मूर्ख
१९) संताप
२२) पदार्थ शिजतानाचा आवाज
२३) पाणी
२८) जिव्हा, बोलणे
३०) स्तुती स्तोत्र
३२) मल्ल
३४)कर्ज देणारा
३६) उणीव, वानवा
३८) अखंड, अतूट
३९) सिंह ४१) ✻✻ दमयंती
४३) अब्रू, लाज
४५) रममाण
४६) लटलट, कंप
४९) दुसऱ्याच्या मनातील विचार जाणणारा
५०) पथ, रस्ता
५३) पक्षांचा समुह
५७) रोपे तयार करण्याची जागा
५८) दिवा घालविणे, विझविणे
६१) मंगल प्रसंगी वाजवण्याचे एक वाद्य
६२) झकास
६३) सर्प
६४) सांडपाणी वाहून नेण्याचा चर
६५) ग्राम, नगर

(उत्तर उद्याच्या अंकात)

**मागील शब्दकोड्याचे उत्तर**



# राज्यस्तरीय तलवारबाजी स्पर्धेत नाशिकच्या श्रागवीला कांस्यपदक

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी)** :- एकविसावी कॅरेट राज्यस्तरीय तलवारबाजी स्पर्धा छत्रपती संभाजीनगर येथे गुरुवारपासून सुरू झाली. त्यात पहिल्या दिवशी ईपी मुलींमध्ये वैयक्तिक प्रकारातील सुवर्णपदकप्राप्त विधी पाटील (पुणे). रौप्यपदकप्राप्त कायरा पुरंदरे (रायगड), तर नाशिकची श्रागवी शेटकर व लातूरची सुमिता गुट्टे यांनी कांस्यपदक प्राप्त केले.



श्रागवी शेटकर ही गेल्या सहा वर्षांपासून तलवारबाजी या खेळाचा सातत्याने सराव करीत आहे. तिच्या यशाबद्दल जिल्हा संघटनेचे अध्यक्ष दत्ता पाटील, तसेच शिवछत्रपती पुरस्कारप्राप्त अशोक दुधारे, दीपक निकम व राजू शिंदे यांनी अभिनंदन केले. जिल्हा क्रीडा अधिकारी मार्गदर्शक अजिंक्य दुधारे व जय शर्मा, तसेच आनंद चकोर यांचे मार्गदर्शन तिला मिळत आहे.

# म्हसरूळला घरफोडीमध्ये गॅस टाक्यांसह टीव्हीची चोरी

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी)** :- राहत्या घराचा कडीकोयंडा तोडून अज्ञात चोरट्यांनी घरातील दोन गॅसच्या टाक्या व महागडा टीव्ही घरफोडी करून चोरून नेल्याची घटना म्हसरूळ येथील श्रीरामनगर येथे घडली.

फिर्यादी बाळकृष्ण त्र्यंबक चव्हाण यांनी म्हसरूळ पोलिसांना दिलेल्या फिर्यादीत असे म्हटले आहे, की त्यांच्या राहत्या घराचा कडीकोयंडा कोणी तरी अज्ञात चोरट्यांनी कशाच्या तरी सहाय्याने तोडून घरात प्रवेश केला.

यावेळी अज्ञात चोरट्यांनी घरात असलेल्या चार हजार रुपये किमतीच्या दोन गॅसच्या टाक्या व ४० हजार रुपये किमतीचा एलजी कंपनीचा टीव्ही असा एकूण ४४ हजार रुपयांचा मुद्देमाल घरफोडी करून चोरून नेला.

या प्रकरणी म्हसरूळ पोलीस ठाण्यात घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस हवालदार खराटे करीत आहेत.

सभी शुभअंक संख्याशास्त्र और ज्योतिषशास्त्र पर आधारित है।

सोमवार ४/५/२०२६
कल्याण शुभअंक

| | | |
|---|---|---|
| ६ | ८ | ९ |
| १६९ | १२५ | १२६ |
| ४५७ | ४४० | २७० |
| ६२ | ८४ | ९५ |
| ६४ | ८६ | ९७ |

सोमवार ४/५/२०२६
मुंबई शुभअंक

| | | |
|---|---|---|
| १ | ३ | ५ |
| ३८० | ४४५ | ११३ |
| ४७० | १२० | १५९ |
| १३ | ३५ | ५७ |
| १५ | ३७ | ५९ |


## छोटी जाहिरात

**ज्योतिष**

ज्योतिषशास्त्र, वास्तुशास्त्र व जन्मकुंडलीप्रमाणे. श्री प्रभूज्योतिष ऋषी. **संपर्क : काश्यपी फ, मामा मुंगी कार्यालयामागे, पंपिंग स्टेशन, गंगापूर रोड, नाशिक. मो. नं. ७५०७००६३८६.**

**वाचकांना सूचना :-** भ्रमर वृत्तपत्रांतून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकुराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्याची पूर्तता जाहिरातदाराकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल भ्रमर वृत्तपत्र जबाबदार राहणार नाही कृपया याची नोंद घ्यावी.

# कामाच्या ठिकाणी महिलांना सुरक्षितता देणारा ‘पॉश’ कायदा

कामाच्या ठिकाणी महिलांना सुरक्षित, सन्मानजनक आणि भयमुक्त वातावरण उपलब्ध करून देणे ही प्रत्येक संस्थेची कायदेशीर तसेच सामाजिक जबाबदारी आहे. या पार्श्वभूमीवर भारत सरकारने लागू केलेला कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ अधिनियम-२०१३ हा महिलांच्या संरक्षणासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण पॉश कायदा ठरला आहे. या कायद्याच्या माध्यमातून केवळ छळाच्या घटनांवर कारवाईच नाही, तर त्याला प्रतिबंध घालण्यासाठी आणि पीडित महिलेला न्याय मिळवून देण्यासाठी सुस्पष्ट यंत्रणा निर्माण करण्यात आली आहे.

या कायद्यानुसार लैंगिक छळ म्हणजे कोणतेही अवांछित, लैंगिक स्वरूपाचे वर्तन होय. यामध्ये शारीरिक स्पर्श, जवळीक साधण्याचा प्रयत्न, लैंगिक कृपेची मागणी, अश्लील टिप्पणी किंवा संदेश, अश्लील साहित्य दाखविणे, नोकरीत लाभ मिळवण्यासाठी लैंगिक अपेक्षा ठेवणे तसेच धमकी, मानसिक छळ किंवा भीतीदायक वातावरण निर्माण करणे यांचा समावेश होतो. अशा प्रकारचे कोणतेही वर्तन महिलांच्या सन्मानाला बाधा पोहोचवणारे असून, ते कायद्याअंतर्गत गुन्हा मानला जातो.

कामाचे ठिकाण ही संकल्पना या कायद्यात अत्यंत व्यापक स्वरूपात मांडण्यात आली आहे. केवळ कार्यालय किंवा संस्था इतक्यापुरती मर्यादित नसून सरकारी व खासगी कार्यालये, उद्योग, स्वयंसेवी संस्था, शैक्षणिक संस्था, रुग्णालये, क्रीडा संस्था, प्रवासादरम्यान वापरली जाणारी अधिकृत वाहतूक, तसेच घरून काम आणि घरगुती कामगारांचे निवासस्थान यांचाही यामध्ये समावेश होतो. त्यामुळे प्रत्येक क्षेत्रातील महिलांना या कायद्याचे संरक्षण मिळते.

कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी १० किंवा त्यापेक्षा अधिक कर्मचारी असलेल्या प्रत्येक संस्थेत अंतर्गत समिती स्थापन करणे बंधनकारक आहे. या समितीचे अध्यक्षपद वरिष्ठ महिला कर्मचाऱ्याकडे असणे आवश्यक असून, समितीत इतर सदस्यांसह बाह्य तज्ज्ञाचाही समावेश केला जातो. तक्रारी स्वीकारणे, चौकशी करणे, ९० दिवसांच्याआत अहवाल सादर करणे आणि आवश्यक शिफारशी देण्यासाठी जबाबदार असते. चौकशी प्रक्रियेदरम्यान गोपनीयता राखणे हे अत्यंत महत्त्वाचे मानले जाते.

ज्या संस्थांमध्ये कर्मचारी संख्या कमी आहे किंवा अंतर्गत समिती स्थापन केलेली नाही, अशा प्रकरणांमध्ये जिल्हाधिकारी यांच्या आधिपत्याखाली स्थानिक समिती कार्यरत असते. नियोक्त्याविरुद्ध तक्रार असल्यास चौकशी केली जाते. यामुळे प्रत्येक महिलेला न्याय मिळविण्यासाठी स्वतंत्र आणि विश्वासार्ह यंत्रणा उपलब्ध होते.

तक्रार नोंदविण्याबाबत देखील कायद्यात स्पष्ट तरतुदी आहेत. पीडित महिलेला घटनेपासून तीन महिन्यांच्या आत लेखी तक्रार दाखल करता येते. विशेष परिस्थितीत ही मुदत सहा महिन्यांपर्यंत वाढविण्याची तरतूद आहे.

तक्रार प्राप्त झाल्यानंतर चौकशी ९० दिवसांच्या आत पूर्ण करणे आवश्यक असून त्यानंतर ६० दिवसांच्या आत नियोक्त्याने योग्य ती कारवाई करणे बंधनकारक आहे. चौकशीदरम्यान पीडित महिलेला बदली, रजा किंवा सुरक्षित कार्यस्थळाची सुविधा यांसारखा अंतरिम दिलासा देण्याचीही तरतूद आहे.

या कायद्यांतर्गत नियोक्त्यांवर महत्त्वपूर्ण जबाबदाऱ्या सोपविण्यात आल्या आहेत. धोरण तयार करून त्याची अंमलबजावणी करणे, अंतर्गत समिती स्थापन करणे, कर्मचाऱ्यांसाठी नियमित प्रशिक्षण व जनजागृती कार्यक्रम आयोजित करणे, कायद्याची माहिती स्पष्टपणे प्रदर्शित करणे आणि तक्रारींवर वेळेत कारवाई करणे ही नियोक्त्यांची प्रमुख कर्तव्ये आहेत. सुरक्षित आणि सन्मानजनक कार्यसंस्कृती निर्माण करण्यासाठी हे उपाय अत्यावश्यक आहेत.

तक्रार सिद्ध झाल्यास संबंधित व्यक्तीवर शिस्तभंगाची कारवाई केली जाऊ शकते. यामध्ये लेखी माफी, चेतावणी, बढती किंवा वेतनवाढ रोखणे, नोकरी समाप्त करणे किंवा आर्थिक दंड लावणे यांचा समावेश असू शकतो, तसेच खोटी तक्रार केल्यास देखील कायद्यांतर्गत कारवाईची तरतूद आहे. माहिती लपविणे किंवा चौकशी प्रक्रियेत अडथळा निर्माण केल्यास दंड आकारला जाऊ शकतो.

महिलांसाठी तक्रार नोंदविण्याची प्रक्रिया अधिक सुलभ करण्यासाठी केंद्र शासनाने हे डिजिटल पोर्टल उपलब्ध करून दिले आहे.

या पोर्टलद्वारे महिला कोणत्याही ठिकाणाहून ऑनलाईन तक्रार नोंदवू शकतात. तक्रार संबंधित अंतर्गत किंवा स्थानिक समितीकडे स्वयंचलितपणे पाठविली जाते आणि तिच्या स्थितीचे ऑनलाईन ट्रॅकिंग करता येते. ही प्रणाली पूर्णपणे सुरक्षित, गोपनीय आणि पारदर्शक आहे.

एकूणच, महिलांचा सन्मान, सुरक्षितता आणि समानतेच्या दृष्टीने अत्यंत प्रभावी कायदा आहे. या कायद्याची काटेकोर अंमलबजावणी करून प्रत्येक कार्यस्थळावर सुरक्षित वातावरण निर्माण करणे ही काळाची गरज आहे. शासन, नियोक्ते आणि कर्मचारी यांनी एकत्रितपणे प्रयत्न केल्यास महिलांसाठी खऱ्या अर्थाने सुरक्षित व विश्वासार्ह कार्यसंस्कृती निर्माण होईल.

**संकलन-** जिल्हा माहिती कार्यालय, नाशिक

# कुंभमेळ्याची सर्व विकास कामे मार्च २०२७ पूर्वी पूर्ण होणार : ना. गिरीश महाजन



**नाशिक (जिमाका वृत्तसेवा) :-** नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे पुढील वर्षी होणाऱ्या कुंभमेळ्यानिमित्त जिल्ह्यात विविध विकास कामे सुरू आहेत. ही सर्व कामे पुढील वर्षी मार्च पूर्वी पूर्णत्वास येतील, असा विश्वास जलसंपदा तथा कुंभमेळामंत्री गिरीश महाजन यांनी येथे व्यक्त केला.

महाराष्ट्र राज्याच्या ६७ व्या स्थापना दिनानिमित्त ध्वजवंदन समारंभ आज सकाळी पोलीस कवायत मैदानावर आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, नाशिक परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक दत्तात्रय कराळे, पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार, पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील, उपविभागीय अधिकारी तथा सहायक जिल्हाधिकारी अर्पिता ठुबे (नाशिक), डॉ. पवन दत्ता (इगतपुरी), उपवनंसरक्षक सिद्धेश सावर्डेकर, राकेश सेपट आदी उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते विविध पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. वाहतूक शाखेच्या सहायक पोलीस आयुक्त अद्वैता शिंदे यांच्या नेतृत्वाखाली पोलीस दलाच्या तुकडीने संचलन केले. यावेळी विविध दलाच्या पथकांनी संचलनात सहभाग घेतला.

ना. महाजन म्हणाले, की रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज, क्रांतिसूर्य महात्मा जोतिराव फुले, छत्रपती शाहू महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महापुरुषांनी व सर्वच थोर समाज सुधारकांनी घालून दिलेला विचारांचा वारसा राज्याने पुढे चालविला आहे. स्थापनेपासून ते आजपर्यंत महाराष्ट्र राज्याने प्रत्येक क्षेत्रात अग्रेसर राहण्याचा ध्यास घेतला आहे. हा अग्रेसर राहण्याचा ध्यास देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई अजित पवार यांनी जोपासला आहे. त्यामुळे महाराष्ट्र राज्य हे प्रत्येक क्षेत्रात अग्रेसर आहे आणि राहील.

कामगार हा राष्ट्राच्या, राज्याचा प्रगतीचा कणा आहे. शेतकरी, उद्योग कामगार, बांधकाम मजूर, सफाई कर्मचारी यांचे योगदान देखील तितकेच महत्त्वाचे आहे. कष्टकरी हातांमुळेच महाराष्ट्र समृद्ध झाला आहे. शासनाच्या वतीने कामगारांच्या कल्याणासाठी विविध योजना राबविण्यात येत आहेत. त्यामध्ये सामाजिक सुरक्षा, आरोग्य, विमा, निवास योजना, असंघटित कामगारांसाठी विशेष उपक्रम राबविले जात आहेत. नाशिक त्र्यंबकेश्वर येथे पुढील वर्षी होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याचा शंखनाद ३१ ऑक्टोबर रोजी ध्वजारोहणाने होईल. त्यानंतर पुढील वर्षी कुंभमेळा आणि अमृत स्नान होईल. या पार्श्वभूमीवर राज्य शासनातर्फे देश- विदेशातून येणाऱ्या भाविकांना आवश्यक पायाभूत सोयीसुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी नाशिक त्र्यंबकेश्वरसह जिल्ह्यात विविध विकास कामे सुरू आहेत.

गोदावरी नदी बारमाही प्रवाही राहावी आणि निर्मळ आणि अविरत पाणी भाविकांना उपलब्ध व्हावे म्हणून विविध योजनांचा समावेश केला आहे. त्यामुळे पुढील वर्षी मार्च पूर्वी कुंभमेळ्यानिमित्त सुरू असलेली विविध विकास कामे पूर्णत्वास येतील. विकास कामे होत असताना शहरासह जिल्हाभरात नागरिकांची काही प्रमाणात गैरसोय होत आहे; मात्र नाशिक शहर आणि जिल्ह्याच्या येणाऱ्या पुढील २५-३० वर्षांच्या नियोजनासाठी ही कामे तितकीच महत्त्वाची आहेत. ही सर्व कामे होत असताना स्वच्छ, सुंदर व हरित नाशिक करण्यासाठी व देशात मॉडेल शहर म्हणून निर्माण करण्यासाठी उन्नत नाशिक अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानाच्या माध्यमातून लोकसहभागाची चळवळ उभी राहत आहे. यामध्ये सर्वांचा सहभाग हा देखील तितकाच महत्त्वाचा आहे.

गेल्या काही दिवसांपासून आपण सर्व जण तीव्र उन्हाचा सामना करीत आहोत. नाशिकसारख्या शहरात तपमानाने चाळीशी ओलांडली. या पार्श्वभूमीवर प्रत्येकाने उन्हापासून स्व- संरक्षणाची काळजी घ्यावी. त्यातही वृद्ध आणि बालकांची काळजी घेणे महत्त्वाचे आहे. घराबाहेर पडताना उन्हापासून संरक्षणाची पुरेशी साधने वापरावीत. भारतीय हवामान विभागाने संभाव्य एल निनोचा अंदाज व्यक्त केला आहे. याचा परिणाम येणाऱ्या पावसावर होण्याची शक्यता आहे. जिल्ह्यात सात मोठे आणि १९ मध्यम प्रकल्प आहेत. त्यांच्यात ४१ टक्के जलसाठा आहे, तर नाशिक शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या गंगापूर धरण समूहात ५४ टक्के जलसाठा आहे. त्यामुळे पाण्याचा काटकसरीने वापर करावा लागणार आहे. पाण्याच्या बचतीसाठी प्रत्येक जिल्ह्यात कृती दल स्थापन करणे, वैरण विकास कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्याचे निर्देश मुख्यमंत्री महोदयांनी दिले आहेत. पाण्याचे सुयोग्य नियोजन, जलसंधारणाच्या कामांना गती आणि जुन्या जलस्रोतांची दुरुस्ती व पुनरुज्जीवन यावर भर देण्यात येणार आहे.

जिल्हा प्रशासनाने आगामी खरीप हंगामाची पूर्व तयारी सुरू केली आहे. जिल्ह्यात खरीप हंगामाचे क्षेत्र सरासरी ६ लाख ४० हजार हेक्टर आहे. प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेच्या २२ हप्त्याचा ४ लाख २६ हजार ८९५ शेतकऱ्यांना ८५ कोटी १० लाख रुपयांचा लाभ देण्यात आला आहे. जिल्ह्यात मागील वर्षांत अतिवृष्टी, अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीपोटी आठ लाखावर शेतकरी खातेदारांना सहाशे आठ कोटी रुपयांचे अनुदान वितरित करण्यात आले आहे. जिल्ह्यात आतापर्यंत २ लाख २० हजार ४३७ शेतकऱ्यांनी महाविस्तार एआय ॲप डाऊनलोड केले आहे. त्यात नाशिक जिल्हा राज्यात तिसऱ्या क्रमांकावर आहे. अन्य खातेदार शेतकऱ्यांनी सुद्धा महाविस्तार एआय ॲप डाऊनलोड करून घ्यावे. येत्या खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांना बी-बियाणे, रासायनिक खतांची कोणतीही टंचाई जाणवणार नाही याची दक्षता घेण्याच्या सूचना कृषी विभागाला दिल्या आहेत, असेही मंत्री महाजन यांनी सांगितले.

मुख्यमंत्री महोदयांच्या दीडशे दिवसांच्या ई गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमात नाशिक पोलीस आयुक्तालय, शबरी विकास महामंडळ आणि नाशिक जिल्हा परिषदेने उल्लेखनीय कामगिरी करीत प्रशासनात जिल्ह्याचा लौकिक वाढविला आहे. या माध्यमातून डिजिटल प्रणालीचा प्रभावी वापर करून प्रशासन पारदर्शक, गतिमान आणि उत्तरदायी होण्यास मदत होत आहे. गेल्याच महिन्यात केंद्र सरकारच्या मिशन कर्मयोगी अंतर्गत आयोजित साधना सप्ताह २०२६ मध्ये राज्याने अव्वल क्रमांक पटकावला ही बाब राज्यासाठी अभिमानास्पद आहे.

यावेळी खा. डॉ. शोभा बच्छाव, महापौर हिमगौरी आडके-आहेर, अपर जिल्हाधिकारी हेमांगी पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी रोहितकुमार राजपूत, उपजिल्हाधिकारी रवींद्र भारदे, शुभांगी भारदे, कुंदन हिरे, अभिजित नाईक, तहसीलदार पंकज पवार, अमोल निकम, प्रदीप वर्पे यांच्यासह स्वातंत्र्य सैनिक, लोकप्रतिनिधी, नागरिक, विद्यार्थी, विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


महाराष्ट्र शासन

**आदिवासी सार्वजनिक बांधकाम विभाग कळवण**

**ई-निविदा सूचना क्रमांक 06 सन 2026-2027**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता आदिवासी सा. बां. विभाग कळवण नाशिक रोड, मानूर, कळवण ता. कळवण जि. नाशिक (दूरध्वनी क्रमांक 02592-221056/222215 हे खालील कामांच्या ‘ब-1’ नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या वर्गातील सार्वजनिक बांधकाम विभागाकडील नोंदणीकृत/अनोंदणीकृत तसेच निविदेतील अटी शर्ती पूर्ण करतील असे ठेकेदारांकडून निविदा मागवीत आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी, तसेच निविदा स्वीकारणे अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता आदिवासी सा. बां. विभाग कळवण यांनी राखून ठेवलेला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही.

निविदा सूचनेत **एकूण (०१) एक काम रुपये २५०.०० लक्ष आतील** समाविष्ट असून या निविदा सूचनेची संपूर्ण माहिती (तपशील) खालील प्रमाणे संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

**1. www.mahapwd.com. 2. https://mahatenders.gov.in**

| | | | |
|---|---|---|---|
| कोऱ्या निविदा विक्री व बीड सबमिशन दिनांक व वेळ | 04/05/2026 11:00 पासून | ते | 11/05/2026 17:00 पर्यंत |

**टीप :** (1) ई-निविदेची किंमत (ना परतावा) व इसारा / बयाणा रक्कम फक्त ऑनलाईन पद्धतीनेच स्वीकारली जाईल. (2) सर्व पात्र/इच्छुक निविदा करांनी निविदा पत्र डाऊनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी ई-निविदा प्रणालीच्या वेबसाईट https://mahatenders.gov.in या पोर्टलवर एनरोल करणे आवश्यक आहे. (3) वरील कामांना Post Qualification Crieteria अंतर्भूत करण्यात आलेला आहे.

सर्व नोंदणीकृत/अनोंदणीकृत सक्षम कंत्राटदारांनी नोंद घ्यावी.

सही/-

**(उमेश. गो. पाटील)**

**कार्यकारी अभियंता**

**आदिवासी सा. बां. विभाग कळवण**

आरओसी-2026-27/क्र. 5/C५३६


# जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून वन विभागाला वाहनांसह बचाव साहित्य

**नाशिक (जिमाका वृत्तसेवा) :-** जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून नाशिक जिल्हा वन विभागासाठी वन्यजीवांच्या रक्षणासाठी उपलब्ध करून देण्यात आलेली वाहने आणि बचाव साहित्य जलसंपदा तथा कुंभमेळामंत्री गिरीश महाजन यांच्या हस्ते वनविभागाला सुपूर्द करण्यात आले.

महाराष्ट्र राज्याच्या ६७ व्या स्थापना दिनानिमित्त ध्वजवंदन समारंभ पोलीस कवायत मैदानावर आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी हा कार्यक्रम झाला. यावेळी विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, नाशिक परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक दत्तात्रय कराळे, पोलिस आयुक्त संदीप कर्णिक, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार, पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील, उपविभागीय अधिकारी तथा सहाय्यक जिल्हाधिकारी अर्पिता ठुबे (नाशिक), डॉ. पवन दत्ता (इगतपुरी), उपवनंसरक्षक सिद्धेश सावर्डेकर, राकेश सेपट आदी उपस्थित होते.

जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून वन्य जीव बचाव पथकासाठी बोलेरो हे वाहन, पिंजरे वाहतुकीसाठी पिकअप वाहन व अन्य अत्यावश्यक बचाव साहित्य उपलब्ध करून देण्यात आले. त्यात बिबटे रेस्क्यू पिंजरे, थर्मल ड्रोन, ट्रॉन्क्यूलायझर गन, ट्रॅप कॅमेरा आदी साहित्याचा समावेश होता. याबरोबरच वन्य प्राणी उपचार केंद्राचे सक्षमीकरण करण्यात येणार आहे. त्यातून मानव आणि वन्यजीव यांच्यातील संघर्ष कमी होण्यास मदत होणार आहे, तसेच पिंजरे वाहतुकीसाठी एयू स्मॉल फायनान्स बँकेच्या सहकार्याने बोलेरो पिकअप वाहन उपलब्ध झाले आहे. ते सुद्धा वनविभागाला सुपूर्द करण्यात आले.


**MAHAGENCO** Maharashtra State Power Generation Co. Ltd.

## E-Tender Notice

Chandrapur Super Thermal Power Station MAHAGENCO, invites bid offers from reputed and experienced Companies to Participate in the Competitive bidding Process to following O&M Tenders.

| S. N. | Tender NO (Rfx No) / Description / Estimated Cost in Rs. |
|---|---|
| 1 | TM-III/ Rfx No.3000067870/Comprehensive maintenance of Hydrogen Dryers & Instrument Air Dryers installed at U#8&9, CSTPS, Chandrapur fpr 2 years./ Rs.13093151.20/- |
| 2 | BM-II/ Rfx No.3000067923/Procurement of Firecrete, White heat and Plastic Refractory for U#7 COH, at CSTPS Chandrapur./ Rs.2689325.00/- |
| 3 | EM-II/ Rfx No.3000067962/Cleaning & Preventive maintenance of GTR, UAT bus ducts, Removal & restoration of connections of transformers, Work of replacement/ screening of Silica Gel in Instrument Air dryer vessel during COH of Unit#7./ Rs.271640.19/- |
| 4 | EM-III/ Rfx No.3000067967/Work of overhauling of HT/LT Boards and other miscellaneous works during Unit-8 AOH, CSTPS, Chandrapur/ Rs.2708266.20/- |
| 5 | EM-II/ Rfx No.3000067958/Work of Internal inspection, Gasket replacement, Oil filtration, Erection, Testing & Commissioning of various capacities of UAT and CWX transformers during COH of Unit#7, CSTPS Chandrapur./ Rs.2198099.25/- |
| 6 | TM-I/ Rfx No.3000067951/ work of renovation of auxiliary steam station and servicing of PRDS header safety valves during Unit#3 COH, CSTPS, Chandrapur./ Rs.1553719.16/- |
| 7 | TM-III/ Rfx No.3000067954/Procurement of LPT nozzles, extraction bellows, fitted keys and sealing strips during AOH of Unit 8 , CSTPS, Chandrapur./ Rs.1385319.00/- |
| 8 | CHP-B/ Rfx No.3000067934/Annual Contract for Work of cable laying/excavation, jointing, tracing & removal of power and control cables at CHPA & CHPB, CSTPS/ Rs.2804686.35/- |
| 9 | BM-II/ Rfx No.3000067924/Procurement of Groove coupling of BBD coal mill pipes in unit 7 for replacement in COH at CSTPS Chandrapur./ Rs.1205440.00/- |
| 10 | ODP-II/ Rfx No.3000068042/Work of repairing / replacement of Splash type PVC V bar for Cooling tower 7A & 7B during U-7 overhaul at ODP-II, CSTPS, Chandrapur./ Rs.2079000.00/- |

Above floated tender published in MAHAGENCO online Portal. For the detailed Tender document, interested bidders should visit SRM Website **https://eprocurement.mahagenco.in for (Sr. No. 01 to 10)** For any query Contact No. 8554991818.

**Sd/-**

**CHIEF ENGINEER (O&M)**

**CSTPS, CHANDRAPUR**


# धारदार शस्त्राने युवकावर हल्ला

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** कुरापत काढून युवकावर धारदार शस्त्राने हल्ला करून त्याला गंभीर दुखापत केल्याप्रकरणी चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी दत्तू सदाहरी कोळपे (रा. शिवाजीनगर, सातपूर, नाशिक) यांचा मुलगा प्रतीक व फिर्यादीकडे कामाला असलेला मुलगा रोशन सुभाष गोतिसे हे दूधवाटप करून झाल्यानंतर केस कटिंग करण्यासाठी आनंदवल्लीकडे जात होते. त्यावेळी शिवाजीनगर येथे गणेश स्वीट्सजवळ आरोपी राहिल, त्याची मैत्रीण आरू व त्यांचे दोन अनोळखी साथीदार यांनी फिर्यादीच्या मुलाची गाडी अडवली. बदाम शेक प्याला नाही याचा राग आला म्हणून कुरापत काढून आरोपी राहिलसोबत असलेल्या दोन जणांनी प्रतीकच्या कानाखाली मारून दुसऱ्या इसमांनी धारदार शस्त्राने छातीवर वार करून गंभीर दुखापत करून सर्व आरोपी पळून गेले. हा प्रकार दि. २९ एप्रिल रोजी रात्री आठ वाजेच्या सुमारास शिवाजीनगर येथे घडला. या प्रकरणी गंगापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक महाजन करीत आहेत.

# अमेरिकेसोबत केलेली ट्रेड डीलच्या निषेधार्थ युवक कॉँग्रेसचे आंदोलन

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-**महाराष्ट्र प्रदेश युवक कॉँग्रेसने केंद्र सरकारच्या अमेरिका ट्रेड डीलविरोधात निफाड येथे जोरदार आंदोलन छेडले.

केंद्र सरकारने अमेरिकेसोबत केलेली ट्रेड डील ही शेतकरीविरोधी असल्याचा आरोप करीत युवक कॉँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी शेतकरी विरोधी अमेरिका कृषी ट्रेड डील रद्द करा अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला. निफाड येथील उपबाजार आवारातून मोठ्या संख्येने ट्रॅक्टर रॅली तहसील कार्यालयावर काढली.

या रॅलीत युवक कॉँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. ही कृषी ट्रेड डील रद्द होत नाही तोपर्यंत अशी किंवा यापेक्षाही तीव्र आंदोलन करण्याचा इशारा यावेळी देण्यात आला.

याप्रसंगी भारतीय कॉँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजाराम पानगव्हाणे, आफ्रिन शेख प्रदेश उपाध्यक्ष, जिल्हा युवा अध्यक्ष, गौरव पानगव्हाणे, सचिन होळकर, सरचिटणीस कॉँग्रेस पक्ष, निफाड विधानसभा युवक कॉँग्रेस अध्यक्ष सचिन खडताळे, विनायक शिंदे, जयदीप कुंदे, स्वप्नील बीनायकीया, सुहास सुरळीकर, वैकुंठ चोपडे, अलीभाई शेख, प्रभाकर हुजबंद, तोशिक राजे, सौरव पगारे, कृष्णा सोनवणे, साहेबराव डोमसे आदी उपस्थित होते.


Sahyadri HOSPITALS A Network Hospital of manipalhospitals

उत्तर महाराष्ट्रात प्रथमच!

कॅन्सरसाठी अत्याधुनिक रेडिएशन थेरपी

आता फक्त सह्याद्रि हॉस्पिटलमध्ये उपलब्ध.




- कर्करोगाचे अचूक निदान आणि आधुनिक उपचार
- अनुभवी ऑन्कोलॉजिस्ट आणि मल्टिडिसिप्लिनरी टीम
- कर्करोगाच्या शस्त्रक्रियेसाठी मॉड्युलर ऑपरेशन थिएटर्स
- प्रगत केमोथेरपी वॉर्ड आणि हेमॅटोलॉजी युनिट
- अत्याधुनिक यंत्रसामुग्री आणि सुरक्षित उपचारपद्धती
- निदानासाठी PET CT ची सुविधा

24 तास 88888 22222

सह्याद्रि सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, नाशिक

मुंबई-आग्रा रोड, द्वारका सर्कल जवळ, वडाळा रोड, नाशिक - ४२२००१

# संपादकीय

## मस्साजोगचा धक्का

**बीड** जिल्ह्याच्या केज तालुक्यातील अत्यंत चर्चेत असलेल्या मस्साजोग ग्रामपंचायतीच्या सरपंच पदाचा निकाल अखेर जाहीर झाला आहे. गेल्या अनेक दिवसांपासून संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागून असलेल्या या पोटनिवडणुकीत मोठा उलटफेर पाहायला मिळाला. मदिवंगत सरपंच संतोष देशमुख यांच्या पत्नी अश्विनी संतोष देशमुख यांचा पराभव झाला आहे. तर स्वरूपानंद देशमुख यांनी ९२ मतांच्या फरकाने बाजी मारत दणदणीत विजय मिळवला आहे. यावरून हेच दिसून येते, की एखादी राजकीय व्यक्ती निधन पावल्यानंतर त्याच्या कुटुंबीयांशी असलेली सहानुभूतीची लाट फार काळ टिकत नाही; अन्यथा अश्विनी देशमुख यांचा विजय निश्चित मानला जात होता; पण त्यांनाच पराभवाला सामोरे जावे लागले. कारण सुमारे वर्षभराने निवडणूक झाली. या काळात सहानुभूतीची लाट ओसरून दिवंगत सरपंचांच्या निवडणुकीच्या वेळी संतोष देशमुख यांचे प्रतिस्पर्धी असलेले स्वरूपानंद देशमुख हे विजयी झालेले आहेत. मस्साजोगचे तत्कालीन सरपंच संतोष देशमुख यांची ९ डिसेंबर २०२४ रोजी निर्घृण हत्या करण्यात आली होती. या धक्कादायक घटनेमुळे हे सरपंचपद रिक्त झाले होते. संतोष अण्णांच्या निधनामुळे गावात निर्माण झालेली पोकळी आणि त्यांच्या अपूर्ण स्वप्नांचा विचार करून ही निवडणूक बिनविरोध व्हावी, अशी मागणी ग्रामस्थांच्या गटाकडून आणि देशमुख कुटुंबाकडून करण्यात आली होती. यानंतर संतोष देशमुख यांच्या पत्नी अश्विनी देशमुख या मस्साजोग ग्रामपंचायतीच्या सरपंचपदाच्या रिंगणात उतरल्या होत्या. त्यांना बिनविरोध निवडून येण्याची संधी देऊन संतोष अण्णांना खरी श्रद्धांजली द्यावी, अशी इच्छा व्यक्त करण्यात येत होती. प्रत्यक्षात उलटेच घडले. त्यांचे प्रतिस्पर्धी निवडून आले. याचा अर्थ त्यांनी निवडणूक होईपर्यंत वर्षभराच्या काळात वातावरण बदलवले होते. विजयानंतर बोलताना स्वरूपानंद देशमुख यांनी सूचित केले, की मी विजयी झालो, त्यामागे ग्रामस्थांचे पाठबळ आणि राजकीय कारकीर्दीत केलेले समाजकार्य कारणीभूत आहे. मीदेखील यापुढे राजकीय भेदाभेद न करता गावाचा विकास करणार आहे. निवडून येणार, अशी खात्री वाटल्यानेच निवडणूक प्रक्रिया काळात स्वरूपानंद देशमुख यांनी शेवटपर्यंत अर्ज मागे घेण्यास नकार दिला. अखेर निकालात स्वरूपानंद देशमुख यांनी बाजी मारली. या निकालाने राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. त्यांनी आपली ताकद वाढवत विजयावर शिक्कामोर्तब केले. दुसरीकडे, संतोष देशमुख यांच्या निधनानंतर ही निवडणूक होत असल्याने अश्विनी देशमुख यांना मोठी सहानुभूती मिळेल, अशी शक्यता वर्तवली जात होती; मात्र मतदारांनी विकासाला किंवा अन्य मुद्द्यांना प्राधान्य दिल्याने ही सहानुभूती फॅक्टर चालला नसल्याचे स्पष्ट झाले आहे. या निवडणुकीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे मस्साजोगमध्ये एकूण २,२८४ मतदार आहेत. यंदाच्या या निवडणुकीत तब्बल ८४ टक्के मतदान झाले. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा मतदानाच्या टक्केवारीत १० टक्क्यांनी वाढ नोंदवण्यात आली. ही वाढच स्वरूपानंद देशमुख यांना विजयी करून गेली, अशीही शक्यता आहे. दोन्ही उमेदवारांनी जोर लावल्यामुळे या निवडणुकीत मतदानाची टक्केवारी प्रचंड वाढली असावी.

## सांगळे स्ट्राईकर्स विजेते; गिरीश महाजन व महापौर हिमगौरी आहेर यांच्या हस्ते खेळाडूंचा गौरव




**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :**–शाल्मली क्षत्रिय मालिकेतील सर्वोत्तम खेळाडू नाशिक जिल्हा क्रिकेट असोसिएशन आयोजित फ्रावशी इंटरनॅशनल प्रेझेंट्स नाशिक महिला प्रीमियर लीगमध्ये हुतात्मा अनंत कान्हेरे मैदान, गोल्फ क्लबवर झालेल्या अंतिम फेरीत अनंत सांगळे यांच्या सांगळे स्ट्राईकर्सने कल्पेश भुतडा यांच्या बालाजी सुपर नोव्हाजवर १० गडी राखून दणदणीत विजय मिळवत स्पर्धेचे अजिंक्यपद पटकावले. अंतिम सामन्यानंतर लगेचच या पहिल्यावहिल्या स्पर्धेचा पुरस्कार सोहळा जलसंपदा व कुंभमेळामंत्री गिरीश महाजन व महापौर हिमगौरी आहेर–आडके यांच्या हस्ते पार पडला. याप्रसंगी नाशिक जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे उत्कृष्टपणे राखलेले क्रिकेट मैदान पाहून खूश झालेल्या गिरीश महाजन यांनी आपल्या भाषणात जोरदार फलंदाजी केली. खेळाडू म्हणून आपल्या महविद्यालयीन जीवनातील आठवणींना उजाळा देत त्यांनी सर्व खेळाडूंना व्यायामाचे महत्त्व पटवून देत व्यसनांपासून दूर राहण्याचा सल्ला दिला आणि महत्त्वाचे म्हणजे गिरीश महाजन यांनी हुतात्मा अनंत कान्हेरे मैदानावर लवकरच प्रकाशझोताची व्यवस्था करून देण्यात येईल, याची महापौर हिमगौरी आहेर–आडके यांच्यासह खात्रीपूर्वक ग्वाही दिली. याप्रसंगी पाचही संघाचे मालक, स्पर्धा समन्वयक क्रीडकचे विनोद यादव व सर्व संबंधितांना गौरविण्यात आले.

मंचावर एम. व्ही. पी. चे सरचिटणीस नितीन ठाकरे, पश्चिम विभाग सभापती सुरेश पाटील, सावजी, रोहिणी नायडू, सुधाकर बडगुजर, अंकिता शिंदे, गोल्डी आनंद, समितीच्या शर्मिला साळी, नाशिक जिल्हा क्रिकेट संघटनेचे चेअरमन विनोद शहा व सेक्रेटरी समीर रकटे उपस्थित होते. समीर रकटे व कुणाल कातकाडे यांनी सूत्रसंचालन केले, तर आभारप्रदर्शन समीर रकटे यांनी केले. पुरस्कार सोहळ्यास सर्व खेळाडू, प्रशिक्षक, पालक , नाशिक जिल्हा क्रिकेट संघटनेचे पदाधिकारी हेमंत देशपांडे, योगेश मुन्ना हिरे, चंद्रशेखर–बंडू– दंदणे, विक्रांत मते, निखिल टिपरी, तरुण गुप्ता, महेंद्र (राजू) आहेर, राघवेंद्र जोशी, हेतल पटेल, जगन्नाथ पिंपळे, शिवाजी उगले, अनिरुद्ध भांडारकर, बाळासाहेब मंडलिक, नितीन धात्रक, प्रवीण घुले आदी उपस्थित होते.

याआधी अंतिम फेरीत बालाजी सुपर नोव्हाजने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना ६ बाद ४६ अशा स्थितीतून कर्णधार तेजस्विनी बाटवालच्या ५२ धावांमुळे २० षटकांत ९ बाद १२२ धावा केल्या.

गौरी अहिरेने १७ धावा केल्या. सांगळे स्ट्राईकर्सच्या श्रद्धा जगतापने ३, कर्णधार शाल्मली क्षत्रिय व कल्याणी कुटेने प्रत्येकी २ तर प्रचीती भवरने १ बळी घेतला. विजयासाठी १२३ धावांचा पाठलाग करताना सांगळे स्ट्राईकर्सच्या सलामीच्या नेहा शेलार व कर्णधार शाल्मली क्षत्रिय या जोडीने उपांत्य फेरीप्रमाणेच पुन्हा एकदा शतकी भागीदारी तर रचलीच पण त्याही पुढे जाऊन १६.२ षटकात बिनबाद १२३ धावा करून स्पर्धेचे विजेतेपद पटकावले. नेहा शेलारने आपला धडाका कायम ठेवत लागोपाठ चौथे अर्धशतक नोंदवत नाबाद ७० धावा फटकावल्या तर कर्णधार शाल्मली क्षत्रियने नाबाद ४१ धावा केल्या.

## सुकाकाथ मसाला

### ऐदी नवरा

**न**वऱ्याच्या ऐदीपणाला शकू पार कंटाळली होती. हे काय जगणे झाले? माणसाला काही स्वाभिमान हवा, अस्मिता हवी. तिने शशांकला फेलावर घेतले, ''शशांक, मला या जगण्याचा कंटाळा आला आहे. छी! या घराचं भाडं माझी आई भरते, कपडालत्ता आत्या देते, घरखर्चाचे पैसे मोठी बहीण पाठवते. मला तर अगदी लाज लाज वाटते.'' शशांकने प्रेमळपणाने शकूला समजावले, ''शकू, तू शांत राहा; पण तू तरी काय करणार? तुझ्या काकांना व मामांना काहीच कसा संकोच नाही याचं मला नवल वाटतं. ते लेकाचे काहीच पाठवत नाहीत. तुझ्या संसाराकडे पूर्ण दुर्लक्ष करत आहेत. तुझ्या त्या काकांना दर महिन्याला एक एक हजार रुपये पाठवायला काय हरकत आहे? मीही कंटाळलो आहे त्यांच्या बेजबाबदारपणाला!''

– पानवाला

## खाण्यासाठी चेंज हवा?

### कॉलीफ्लॉवरची मसालेदार भाजी

**साहित्य :**– १ किलो कॉलिफ्लॉवर, १ वाटी धणे अर्धा चमचा हळद, १ चमचे तिखट, १० लसूण पाकळ्या, ५ चमचे तेल, अर्धा चमचा मोहरी, १ चमचा मीठ (किंवा जास्त).



**कृती :**– फ्लॉवर नीट करून बारीक चिरावा किंवा आवडीनुसार मध्यम तुरे ठेवावे. धुऊन पंधरा मिनिटे पाव चमचा हळद घातलेल्या पाण्यात बुडवून ठेवावा. नंतर चाळणीवर निथळत ठेवून पुन्हा त्यावर साधे पाणी घालावे, एकीकडे लसूण, धणे, हळद व तिखट कच्चेच पाट्यावर वाटून घ्यावे. पातेल्यात तेल तापले, की त्यात मोहरी घालवी. तडतडला की वाटलेला मसाला खमंग परतावा. खाली उतरवून त्यात कॉलिफ्लॉवर घालावा व अलगद ढवळावे. थोडा पाण्याचा शिपका देऊन पाण्याचे झाकण ठेवावे व मंद विस्तवावर भाजी ठेवावी. दहा मिनिटांनंतर मीठ व वाटल्यास थोडे पाणी घालून भाजी पूर्ण शिजवावी.

– **ऐश्वर्या राजेंद्र काळे**

## वीरेंद्र शास्त्री आनंद स्वरूपांवर कारवाई करा

### अखिल भारतीय मराठा महासंघाची पोलिसांकडे मागणी

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :**– महाराष्ट्राच्या अस्मितेचे दैवत आणि हिंदू स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्याविषयी अपमानास्पद वक्तव्य करणाऱ्या धीरेंद्र शास्त्री व स्वामी आनंद स्वरूप यांच्या विरोधात तत्काळ कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी सकल मराठा समाजाच्या विविध संघटनांनी केली.



छत्रपती शिवाजी महाराजांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत स्वराज्याची उभारणी करताना बलाढ्य सत्तांना पराभूत केले आणि सर्वसमावेशक न्याय व लोककल्याणकारी राज्यव्यवस्था उभी केली. त्यांनी कोणत्याही जाती–धर्मांचा भेदभाव न करता हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. अशा महान कार्याचा विपर्यास करून चुकीचा इतिहास समाजासमोर मांडण्याचा प्रयत्न हा गंभीर स्वरूपाचा असून, तो भावी पिढ्यांसाठी धोकादायक आहे. त्यांनी केलेल्या वक्तव्यामुळे राज्यभर संतापाची तीव्र लाट उसळली असून, संबंधितांवर कायद्यानुसार तत्काळ गुन्हा दाखल करण्यात यावा. यावेळी तक्रार देण्यासाठी अखिल भारतीय मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष चंद्रकांत बनकर, संभाजी ब्रिगेडचे प्रफुल्ल वाघ, छावा क्रांतिवीर सेनेचे करण गायकर, राजेंद्र शेळके, वैभव वडजे, रमेश खापरे, ॲड. गौरव गाजरे, संदीप हांडगे, सागर कातड, हिरामण वाघ, विशाल वारुळे, हार्दिक निगळ, महेंद्र बेहेरे, गणेश पाटील, प्रमिला पाटील आदी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


## आरोग्य विद्यापीठात महाराष्ट्रदिन साजरा



**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :**– येथील महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठामध्ये महाराष्ट्रदिनी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे यांच्या हस्ते विद्यापीठ प्रांगणात ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी कुलसचिव डॉ. राजेंद्र बंगाळ, परीक्षा नियंत्रक डॉ. संदीप कडू, वित्त व लेखाधिकारी बोधिकिरण सोनकांबळे, डॉ. देवेंद्र पाटील, डॉ. मिलिंद निकुंभ आदी मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे यांनी सांगितले, की महाराष्ट्र राज्याची संस्कृती व इतिहास वैभवशाली आहे. विद्यापीठात काम करताना सर्वांनी समाजहिताच्या दृष्टीने योगदान द्यावे. शासनाच्या विविध योजना असून, त्यात आपला सहभाग असणे अभिप्रेत आहे. सामाजिक आरोग्य व त्या अनुषंगिक बाबींवर काम करण्यासाठी आपण स्वयंसेवक म्हणून काम करणे गरजेचे आहे. विद्यापीठाच्या धोरणात सामाजिक समस्या सोडविण्यासाठी योग्य बाबींचा समावेश करून उज्ज्वल महाराष्ट्र घडविण्यात आपला सहभाग नोंदवू, असे त्यांनी सांगितले. यावेळी वंदे मातरम्, राष्ट्रगीत व 'जय जय महाराष्ट्र माझा हे राज्यगीत घेण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जनसंपर्क अधिकारी डॉ. स्वप्नील तोरणे यांनी केले. या कार्यक्रमास विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भ्रमर शब्दकोडे क्र. ३७४



**उभे शब्द :** १) अवकाशयान (इंग्रजीत) २) एक म्हण-** तो कान पिळी ३) महाराष्ट्राचे एक माजी मुख्यमंत्री ४) आठवण (हिंदीत) ५) फूल, मुलीचे एक नाव ६) थांगपत्ता ८) हळू, मंद गतीने ११) इंग्रजी मुळाक्षरातील अठरावे अक्षर १३) लग्न (हिंदीत) १५) हात, रक उलट लिहा १६) लिंबूपाण्याचे पेय १७) आईचा भाऊ १९) माहेरच्या विरूध्दार्थी शब्द २२) फायदा २३) लाकूड कापण्याचे एक साधन २६) एक मराठी न्यूज चॅनेल २८) पाच दुणे ३०) शर्थ, टअ उलट लिहा ३१) सूर्य, भास्कर ३३) उत्सवादरम्यान मंडळे गोळा करतात ती देणगी ३४) चलाख, सुस्तच्या विरूध्दार्थी शब्द ३६) मुस्लिम बांधवांची गाण्यांची मैफल ३७) नशीब (इंग्रजीत) ३९) आईची बहीण ४०) दिल्लीच्या एक माजी मुख्यमंत्री-** दीक्षित ४१) एक पक्षी ४३) एक म्हण-आधी पाया मग *** ४४) ससा आणि याची गोष्ट प्रसिध्द आहे ४५) उद्या (हिंदीत) ४७)स्व. गानसम्राज्ञी-** मंगेशकर

**आडवे शब्द :** १) प्रियांका गांधी यांचे पती -*** वड्रा ३) ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या कन्या ६) मुंबईलगतचा जिल्हा ७) एक फळ ८) छक्केपंजे माहीत नसलेला, स्वभावाने सरळमार्गी ९) धमकी देणे १०) एक म्हण-** करील ते राव काय करील ११) जावकच्या विरूध्दार्थी शब्द १२) गुंगी, बेहोशी १४) व्यवस्थित १६) दिलीप प्रभावळकर, यशवंत दत्त अभिनीत एक राजकीय चित्रपट १८) छोटी प्रवासी गाडी १९) सत्वांश, अर्क २०) राश उलट लिहा २१) आदरसत्कार, **पान २३) पाठीची मणक्यांची माळ, एक प्रसिध्द कविता २४) साईबाबांचे बोधवाक्य-*** मालिक एक २५) एखाद्या गोष्टीचा घेतलेला ध्यास २७) वडील (इंग्रजीत) २९) तर उलट लिहा, मग्न ३०) निवडणुकीपूर्वी उमेदवाराने भरलेली रक्कम, डिपॉझिट (मराठीत) ३२) हातवारे करून केलेला अभिनय ३४) बसावयास अंथरतात ती ३५) कथेतील पंख असलेली स्त्री ३६) केस काळे करण्यासाठी करतात ते ३८) प्रवेशद्वारावर स्वागतासाठी उभारतात ती ४१) जल, उदक ४२) गोधडी ४३) कलावंत, अभिनेता ४५) छोटा हंडा ४६) प्रश्न (हिंदीत) ४८)भारत जोडो यात्रा काढणारे राष्ट्रीय काँग्रेसचे नेते-*** गांधी ४९) सांगली जिल्ह्यातील एक तालुका, एक विधानसभा मतदारसंघ

### शब्दकोडे क्र. ३७३ चे उत्तर

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| आ | दि | त्य | | रो | हि | त | | अ | ज | य | |
| व | न | | व | ह | म | | ग | ज | रा | | मुं |
| ड | | च | ल | न | | श | रा | ब | | दा | ब |
| | स | म | य | | स | र | डा | | जा | व | ई |
| ब | द | क | | गु | ला | म | | ग | ल | त | |
| ग | रा | | क | ला | म | | सा | म | ना | | ध |
| ळा | | ग | री | ब | | पा | ल | क | | गा | व |
| | क | ल | म | | पा | ड | स | | भो | ज | न |
| भा | र | त | | फ | त | वा | | उ | प | र | |
| क | डी | | बा | ल | क | | सा | प | ळा | | कं |
| री | | उ | द | क | | न | ग | मा | | रा | ग |
| | रू | मा | ल | | उं | दी | र | | का | म | ना |

## रावळगाव महाविद्यालयात महाराष्ट्रदिन साजरा



**रावळगाव (भ्रमर वार्ताहर) :**– येथील श्री स्वामी समर्थ विद्याप्रसारक मंडळाच्या महाविद्यालयात महाराष्ट्रदिन व आंतरराष्ट्रीय कामगारदिन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सुरेश वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रल्हाद वाय. व्याळीज हे होते.

या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रल्हाद वाय. व्याळीज यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी बोलताना प्राचार्य व्याळीज यांनी महाराष्ट्र दिनाचे महत्त्व अधोरेखित केले. ते म्हणाले, की मराठी भाषिकांचे स्वतंत्र महाराष्ट्र राज्य व्हावे, यासाठी १०६ वीरांनी आपल्या प्राणाची आहुती दिलेली असून, महाराष्ट्र हा महान परंपरा, संस्कृती आणि पराक्रम यांचा संगम असलेले एक राज्य आहे. आज देशात महाराष्ट्र सर्वच क्षेत्रांत प्रगती करत असून, हा प्रगतीचा आलेख उंचावण्यासाठी सर्वांनी महाराष्ट्र धर्माचे पालन करून, प्रत्येकाने राज्याच्या प्रगतीस हातभार लावावा व महाराष्ट्राची पताका उंचावण्यासाठी प्रयत्नशील राहावे, तसेच कामगार दिनाचे महत्त्व स्पष्ट करीत त्यांनी समाजाच्या उभारणीत कामगारांचे योगदान अनमोल असल्याचे नमूद केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. कामेश गायकवाड यांनी केले. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ज्येष्ठ कलाकारांच्या समस्यांबाबत मुख्यमंत्र्यांशी चर्चा : चव्हाण

**मुंबई (भ्रमर वृत्तसेवा) :**– ज्येष्ठ कलाकारांना व सिने क्षेत्रातील कामगारांना सामाजिक जीवनात भेडसावणाऱ्या समस्यांबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व सांस्कृतिकमंत्री आशिष शेलार यांच्याशी चर्चा करून त्या सोडवण्यासाठी नक्की प्रयत्न करीन, अशी ग्वाही भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी दिली.




सिने आर्टिस्ट वेलफेअर ट्रस्ट (सीएडब्ल्यूटी) आणि सिने अ‍ॅण्ड टीव्ही आर्टिस्ट असोसिएशनच्या वतीने आयोजित एका कार्यक्रमात रवींद्र चव्हाण बोलत होते. ते पुढे म्हणाले, की अभिनय क्षेत्रातील प्रत्येक कलाकाराचा एक प्रसिद्धीचा काळ असतो. तो चांगला काळ ओसरला, की सरत्या काळात त्या कलाकारांकडे कोणी पाहत नाही. त्यांची कोणी चौकशी करीत नाहीत. असे जवळपास ९ ते १० हजार कलाकार सध्या अभिनय क्षेत्रात आहेत. अशा कलाकारांचे दैनंदिन जीवन अतिशय हलाखीचे असते. यात अभिनय क्षेत्रात काम करणारे इतर कामगार यांची संख्याही मोठी आहे. यांना सामाजिक जीवनात अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते, अशी माहिती मला सीएडब्ल्यूटीच्या अध्यक्षा प्रीती सप्रू यांनी मला दिली आहे.

या सर्व समस्यांचे निराकरण करण्याबाबत मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि सांस्कृतिकमंत्री आशिष शेलार यांच्याशी चर्चा करून लवकरात लवकर सोडवण्याचा प्रयत्न करणार आहे. सीएडब्ल्यूटीच्या अभिनय क्षेत्रातील दिग्गज कलाकारांना आपण सिनेमाच्या रूपेरी पडद्यावर पाहतो. या क्षेत्रात मिळणारा पैसा व माया यांची चर्चा आपण ऐकतो. पण प्रसिद्धीच्या पडद्याबाहेर गेल्यावर त्या कलाकारांच्या आयुष्यामध्ये किती दुःख असते, ते आपल्याला कधीही दिसत नाही.

अशा या ज्येष्ठ कलाकारांसाठी दिलीप कुमार, सुनील दत्त, मिथुन चक्रवर्ती, जॉनी लिव्हर व आशा पारेख यांसारख्या कलाकारांनी एकत्र येऊन ज्येष्ठ कलाकारांचे दुःख, त्यांच्या गरजा, त्यांचे आजारपण यांसारख्या समस्या सोडविण्यासाठी सीएडब्ल्यूटी सारखा एक मंच तयार केला असून, या संस्थेतर्फे केले जाणारे काम अतिशय कौतुकास्पद आहे, असा गुणगौरव भाजपचे महाराष्ट्राचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी यावेळी बोलताना केला.

सिने आर्टिस्ट वेल्फेअर ट्रस्ट (सीएडब्ल्यूटी ) आणि सिने ॲण्ड टीव्ही आर्टिस्ट असोसिएशनच्या वतीने सीएडब्ल्यूटीच्या स्थापनेत आणि सीआयएनटीएए – सीएडब्ल्यूटी टॉवरच्या उभारणीत ज्या विश्वस्त कलाकारांनी आपले अमूल्य योगदान दिले, त्यामध्ये प्रामुख्याने सुप्रसिद्ध अभिनेते दिलीप कुमार, सुनील दत्त, मिथुन चक्रवर्ती, जॉनी लिव्हर, आशा पारेख, अमरीश पुरी, अमजद खान, चंद्रशेखर वैद्य व दारासिंह या कलाकारांचा सन्मान करण्यासाठी त्या कलाकारांचे फोटो व माहिती देणाऱ्या फलकाचे उद्घाटन भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले, तसेच सीएडब्ल्यूटीला ज्येष्ठ कलाकारांकरिता मी कोकणातील केसरी, सावंतवाडी येथील माझी स्वतःची एक एकर जागा देण्यास तयार असल्याचे त्यांनी सांगितले. याप्रसंगी ज्येष्ठ अभिनेत्री व सीएडब्ल्यूटीच्या अध्यक्षा प्रीती सप्रू, ट्रस्टच्या सचिव अभिनेत्री संभावना सेठ, संस्थेचे खजिनदार अभिनेते दीपक पराशर, बॉलिवूड अभिनेते राजपाल यादव, मनोज जोशी, मुकेश ऋषी, आयुब खान, अभिनेत्री कुनिका आणि सिने व टीव्ही क्षेत्रातील अनेक कलाकार उपस्थित होते.

# चित्ररथ व प्रभात फेरीतून महाराष्ट्राच्या पारंपरिक संस्कृतीची जपणूक



**लासलगाव (भ्रमर वार्ताहर):–** लासलगाव शिक्षण सहाय्यक मंडळ संचलित तिन्ही विद्याशाखांतर्फे महाराष्ट्र दिन व आंतरराष्ट्रीय कामगार दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. जिजामाता प्राथमिक शाळेने ''पर्यावरण रक्षण काळाची गरज'' दाखवणारा चित्ररथ तर लोकनेते दत्ताजी पाटील विद्यालयाने ''मानव आणि वन्यजीव संघर्ष'' तसेच जिजामाता कन्या विद्यालयाच्या वतीने''महाराष्ट्र ही संतांची भूमी तसेच छत्रपती शिवाजी महाराज व संत तुकाराम भेट'' यांचा देखावा असलेला चित्ररथ सादर केला .यावेळी डोक्यावर फेटे बांधलेल्या व कलश धारण केलेल्या तसेच नऊवारी पैठणी साडी परिधान कैलेल्या विद्यार्थिनी आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरल्याने मोबाईल चित्रीकरण करण्याचा मोह ग्रामस्थांना आवरता आला नाही. असे सामाजिक आणि धार्मिक संदेश देणारे देखावे असल्याने महाराष्ट्र दिनानिमित्त काढण्यात आलेल्या प्रभात फेरीचे लासलगावकरांनी कौतुक केले .झांजर व लेझीम पथक,एनसीसी,स्काऊट गाईड, हरित सेना,विद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थिनींनी पारंपारीक वेशभूषा परिधान करून मिरवणुकीची शोभा वाढवली. सेवानिवृत्त भारत तिब्बत सीमा पोलीस बल सुभेदार शंकरराव जाधव यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करून कलश पुजन आणि कै.दत्ताजी पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन करून मिरवणुकीस सुरुवात करण्यात आली. संस्थेचा माजी विद्यार्थी अभिषेक पाटील याची महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत राजपत्रित अधिकारी पदी निवड झाल्याबद्दल तसेच प्राजक्ता पाटीलची औषध निर्माता कल्याण डोंबिवली महानगरपालिका पदी निवड झाल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला .

याप्रसंगी लासलगाव शिक्षण सहाय्यक मंडळाच्या अध्यक्षा निताताई पाटील,सचिव संजय पाटील,उपाध्यक्ष निवृत्ती गायकर, खजिनदार अभय पाटील,सिताराम जगताप,लक्ष्मण मापारी, कैलास ठोंबरे,डॉ.सुरेश दरेकर, प्रकाश गांगुर्डे,जनार्दन जगताप, भागवतराव होळकर,विठ्ठलराव गायकर ,तुळशीराम जाधव,भागवतराव जाधव, दिलीप पानगव्हाणे, किशोर क्षीरसागर,सुभाष रोटे,पोपट नवले,संजय ठोंबरे, राजाभाऊ कराड, दिलीप देसाई, अनिस शेख, शेखर सोनवणे, कौतिक आवारे, दशरथ पायमोडे,दत्तू गांगुर्डे, संजीवनी पाटील,शोभा पाटील,लासलगाव प्रेस क्लबचे सर्व सदस्य,लोकनेते दत्ताजी पाटील विद्यालयाचे प्राचार्य विजय वाणी,जिजामाता कन्या विद्यालयाच्या मुख्याध्यापिका शारदा केदार जिजामाता प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक मोहन निकम आदी मान्यवर तसेच सर्व शिक्षक- शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय प्रमोद पवार यांनी केले तर सूत्रसंचालन निलेश खैरे व प्रमोद काळे यांनी केले.

# ना. भुजबळ यांनी लक्ष घातल्याने लासलगावचा कचरा डेपो प्रश्न मार्गी लागतोय

**लासलगाव (भ्रमर वार्ताहर) :–**लासलगाव येथील शिवनदीकाठावर गेल्या अनेक वर्षांपासून डोकेदुखी ठरलेल्या कचरा डेपोची समस्या अखेर कायमस्वरूपी मार्गी लागली आहे. राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांच्या सहकार्यातून आणि जयदत्त होळकर यांच्या मागणीनुसार, या समस्येचे निराकरण करण्यासाठी युद्धपातळीवर उपाययोजना सुरू करण्यात आल्या असून यामुळे लासलगावकरांना मोठा दिलासा मिळाला आहे.

या समस्येची पार्श्वभूमी पाहता, प्रभाग क्रमांक तीन आणि परिसरातील महाविद्यालयाला या कचराकुंडीमुळे मोठ्या प्रमाणावर त्रास सहन करावा लागत होता. अज्ञात व्यक्तींकडून अनेकदा या ठिकाणचा कचरा पेटवून दिला जात असे. त्यामुळे सदरचा परिसरात धुराचे साम्राज्य पसरायचे. या विषारी धुरामुळे स्थानिक नागरिक, विद्यार्थी आणि जनावरांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला होता.

शिवनदीच्या काठी साचलेल्या कचऱ्याच्या ढिगाऱ्यामुळे परिसरात मोठी दुर्गंधी पसरली होती, ज्याचा फटका संपूर्ण गावाला बसत होता. गेल्या काही दिवसांपासून मोठ्या वेगाने या भागातील झालेला काचेचा



हायवा वाहनाच्या द्वारे बाहेर पाठविला जात आहे, त्यामुळे दुर्गंधी आणि प्रदूषण कमी होण्यास मोठी मदत होत आहे.

या गंभीर परिस्थितीची दखल घेत शिवनदी संवर्धनासाठी सुमारे १३ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. या योजनेअंतर्गत कचरा डेपो हटवण्यासाठी शासनाचा ८० टक्के हिस्सा आणि ग्रामपंचायतीचा स्वनिधी २० टक्के हिस्सा वापरून अनेक वर्षांचा साचलेला कचरा डेपो चा प्रश्न मार्गी लावण्यात आला आहे. आता हा परिसर कचरामुक्त झाला असून नदीकाठाने मोकळा श्वास घेतला आहे. भविष्यात पुन्हा कचऱ्याचे ढिगारे साचू नयेत यासाठी या ठिकाणी आधुनिक कचरा प्रक्रिया मशिनरी बसवण्यात आली आहे. या यंत्रणेद्वारे गोळा होणाऱ्या कचऱ्यापासून तत्काळ खत निर्माण केले जाणार आहे.

यासाठी ग्रामपंचायत सफाई कर्मचाऱ्यांमार्फत आता गावातील ओला कचरा, सुका कचरा आणि प्लास्टिक यांची शास्त्रीय पद्धतीने विगतवारी (वर्गीकरण) केली जाणार आहे. कचऱ्याची विल्हेवाट लावण्याची प्रक्रिया अधिक सुटसुटीत होणार आहे.

> जयदत्त होळकर यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे आणि मंत्री भुजबळ यांच्या सकारात्मक निर्णयामुळे लासलगावकरांचा हा जिव्हाळ्याचा प्रश्न सुटला आहे. या नियोजित प्रकल्पामुळे शिवनदीचे प्रदूषण थांबणार असून परिसरातील नागरिकांचे आरोग्य सुरक्षित राहणार आहे. कचरा डेपोची समस्या निकालात निघाल्याने ग्रामपंचायत प्रशासन आणि स्थानिक नागरिकांकडून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.
>
> **–योगिता पाटील**
> सरपंच लासलगाव

**● नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** शहरात कुंभमेळ्यानिमित्त सुरू असलेल्या विकासाच्या कामांमुळे अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. रस्त्यांची सुरू असलेली कामे त्यामुळे मोठ्या अडथळ्यांना सामोरे जावे लागत आहे. विशेषत: नोकरवर्गांना याचा जास्त त्रास सहन करावा लागताना दिसून येत आहे.

# फॅन पेक्षा ब्रॅंडेड कुलर खरेदीकडे अधिक गर्दी



**लासलगाव (भ्रमर वार्ताहर):–**गेल्या काही दिवसापासून सूर्य आग ओकू लागल्यावर तापमानाचा पारा ४२ अंश सेल्सिअसपेक्षा अधिक नंदीला जात असल्याने भयानक कडक उष्मा घट परिणाम जाणवत आहे. त्यामुळे नागरिकांची गेल्या काही दिवसापासून फॅन आणि कुलर खरेदीकडे अधिक गर्दी झाल्याचे दिसून येत आहे गेल्या वर्षाच्या तुलनेत यंदा उन्हाळा कडक असल्याने माळ पुरविणाऱ्या व्यवसायिकांकडे देखील जास्त मागणी झाल्याने कुलरच्या किंमतीत ३०० ते ४०० रुपये प्रति नग वाढ झालेली आहे खाजगी कंपन्यांच्या कुलर पेक्षा ब्रॅंडेड नामवंत कंपन्यांच्या कुलरला जादा दर असूनही विशेष मागणी दिसत आहे. त्या तुलनेत फॅनची त्यांची मागणी कमी झाल्याचे दिसून येत आहे फॅन मध्ये देखील नवीन नवीन प्रकार विक्रीस आलेले आहेत..

# देवळा येथे विविध मागण्यांसाठी निवृत्तिवेतनधारकाचे उपोषण

**देवळा (भ्रमर वार्ताहर):–** तालुक्यातील पंचायत समितीच्या शिक्षण विभागातील प्रशासकीय गोंधळामुळे सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या निवृत्तीवेतन व इतर कामात नेहमीच दिरंगाई होत असून, त्याबाबत गटविकास अधिकाऱ्यांना वेळोवेळी पाठपुरावा करूनही काहीही कार्यवाही होत नसल्याने देवळा तालुका पेन्शनर्स असोसिएशनच्या वतीने तालुकाध्यक्ष दिलीप आहेर व सरचिटणीस संजय ब्राह्मणकर यांच्या नेतृत्वाखाली पंचायत समिती कार्यालयासमोर लाक्षणिक उपोषण सुरू करण्यात आले होते.

यावेळी गटविकास अधिकारी प्रशांत पवार यांनी दिलेल्या लेखी आश्वासनानंतर उपोषण स्थगित करण्यात आले. अंश राशीकरणाचे हप्ते संपून चार ते सहा महिने उलटूनही कपात थांबलेली नाही. अतिरिक्त कपात झालेली रक्कमही परत मिळालेली नाही.

गट विमा प्रकरणे वेळेवर पाठवली जात नसल्याने काही प्रकरणे एक ते दोन वर्षांपासून प्रलंबित आहेत. ८०, ८५, ९० व ९५ वर्ष पूर्ण झालेल्या पेन्शनधारकांना नियमानुसार पेन्शन वाढ मिळणे अपेक्षित असतानाही, अर्ज करूनही सहा महिने ते वर्षभर विलंब होत आहे. परिणामी, फरकाची रक्कमही मिळत नाही. वारंवार पाठपुरावा करूनही कामे मार्गी लागत नसल्याची तक्रार पेन्शनर्सनी केली आहे. तसेच एपी १५ रजिस्टर व पीपीओ नोंदी अपूर्ण असल्याने अनेक कामे रखडली आहेत. पेन्शन मंजुरी, फरक रक्कम, रिवाईज पेन्शन व काल्पनिक वेतनवाढ प्रकरणेही वेळेवर पूर्ण होत नसल्यामुळे सेवानिवृत्तांना आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. दरम्यान, पेन्शन विभागातील संबंधित कर्मचारी दिनांक ६ एप्रिल २०२६ पासून दीर्घ रजेवर असून, प्रशासनाने अद्याप पर्यायी व्यवस्था केलेली नाही. यामुळे समस्या अधिकच गंभीर बनली आहे. शिक्षण विभागाने सेवानिवृत्तांचे काम माहिती असणारा कर्मचारी दयावा यासह सर्व प्रलंबित प्रश्नांवर तातडीने तोडगा न निघाल्याने देवळा तालुका पेन्शनर्स असोसिएशनचे पदाधिकारी व सदस्य उपोषणास बसले होते.

यावेळी जिल्हाध्यक्ष बाळासाहेब खैरनार, जिल्हा सरचिटणीस धनराज वाणी, राज्य नेते काळू बोरसे, केदु देशमाने, तालुकाध्यक्ष दिलीप पाटील, तालुका सरचिटणीस संजय ब्राम्हणकार, कि. वा. निकम, रा. पा. आहेर, भा. ता. अहिरे, अशोक वाघ, लता पगार, रेश्मा देवरे, सुमन आहेर, प्रमिला देवरे, मालती मेतकर, शिवाजी आहेर, गंगाधर भामरे, बापू पवार, पी. के. सोनवणे, अविनाश आहिरे, अशोक आहेर, डी. डी. पगार, तुळशीराम आढाव, बाजीराव जाधव, पी. पी. निकम, राजेंद्र जाधव, संजय देवरे, देवाजी निकम, दादाजी खैरनार, नथु अहिरे, विजय देवरे, केवळ वाघ, रमेश सोनवणे, दिनकर देवरे, लता निकम, शोभा वाघ, शकील तांबोळी, शिरीष पवार, बाळासाहेब मेधने, विजया जाधव, अनिता आहेर, गंगाधर निकम यांच्यासह सेवानिवृत्त वेतनधारक बहुसंख्येने उपस्थित होते.

## हारकूबाई दायमा यांचे निधन



**लासलगाव (भ्रमर वार्ताहर) :–** येथील धार्मिक परिवारातील मदनलाल मोतीलाल दायमा यांच्या मातोश्री हारकुबाई मोतीलालजी दायमा (वय ९८) यांचे नुकतेच वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांचे पश्चात नाशिक मर्चंट बँकेचे व्हाइस चेअरमन, प्रकाश दायमा, प्रा. कैलास, श्री बालाजी मंदिराचे अध्यक्ष डॉ. श्रीनिवास दायमा व अशोक दायमा यांच्या मातोश्री होत. त्यांच्या पश्चात पाच मुले,सुना नातवंडे आणि पतवंडे असा परिवार आहे.

# अधिसूचना

## भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम 2013 चे कलम 19 (1) नुसार अधिसूचना

## जिल्हाधिकारी नाशिक, जिल्हा नाशिक यांचे कार्यालय

वाचले – महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग एक – गुरुवार ते बुधवार 22 ते 28 जानेवारी 2026
क्रमांक – भूसं/कक्ष/10/3/कावि/105/2026 नाशिक दिनांक 26/04/2026

ज्या अर्थी, समुचित शासन असलेल्या नाशिक जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याने, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, 2013 (2013 चा 30) (यात या पुढे ज्याचा निर्देश ''उक्त अधिनियम'' असा केला आहे.) यांच्या कलम 11 च्या पोटकलम (1) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून अधिसूचना क्रमांक भूसं/कक्ष/10/3/कावि/05/2026 दि. 12/01/2026 अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढली आहे, आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, या सोबत जोडलेल्या अनुसूची ''एक'' मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसूची ''दोन'' मध्ये अधिक तपशिलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्या अर्थी, नाशिक जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांनी, कलम 15 च्या पोटकलम (2) अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिन संपादित करण्याची आवश्यकता आहे या बाबत त्याची खात्री पटली आहे; आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम 19 च्या पोटकलम (1) च्या तरतुदीन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्या अर्थी, अनुसूची ''तीन'' मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधीत कुटुंबीयांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी ''पुनर्वसाहत क्षेत्र'' म्हणून निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले जात असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची चार मध्ये विनिर्दिष्ट केला आहे;

आणि ज्या अर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम 3 च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्य पार पाडण्यासाठी **उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) लघु पाटबंधारे, नाशिक** यास पदनिर्देशित करीत आहे.

**अनुसूची - एक**
**संपादित करावयाच्या जमिनीचे वर्णन**

गावाचे नाव :– मौजे पाथर्डी, तालुका, जिल्हा :– नाशिक
भूसंपादन प्रस्ताव क्रमांक – 10/25

| अ. क्र. | गट नं./स. नं. | क्षेत्र (चौ. मी.) |
|---|---|---|
| 1) | 34 | 5850.00 |
| 2) | 37/1/2 | |
| | 37/2 | 8155.00 |
| 3) | 37/4/ब | 1230.00 |
| 4) | 37/3/4 | 775.00 |
| 5) | 37/3/3 | 575.00 |
| 6) | 37/3/2 | 450.00 |
| 7) | 36 पै. | 3070.00 |
| 8) | 38 पै. | 2177.00 |
| | | 2631.00 |
| | | 1002.00 |
| 9) | 41 पै. | 1160.00 |
| | | 1140.00 |
| | | 920.00 |
| | | 1060.00 |
| | | 860.00 |
| | | 2140.00 |
| | | 875.00 |
| 10) | 72 पै. | 2560.00 |
| | | 2840.00 |
| | | 2530.00 |
| | | 2980.00 |
| | | 2490.00 |
| | | 5680.00 |
| 11) | 76/2 ब, 76/2 अ/1 | 3355.00 |
| 12) | 345/1 | 1645.00 |
| 13) | 345/1 | 1375.00 |
| 14) | 345/4 ब | 1140.00 |
| 15) | 345/4/अ 1 | 1965.00 |
| 16) | 81/1 पै. | 1385.00 |
| | | 2360.00 |
| 17) | 81/2 | 2930.00 |
| 18) | 80/1 | 3560.00 |
| 19) | 80/2 | 3440.00 |
| 20) | 346/2 | 1045.00 |
| | | 1090.00 |
| | | 1050.00 |
| 21) | 346/1 | 1585.00 |
| 22) | 85/1 | 7480.00 |
| 23) | 85/2 | 1670.00 |
| 24) | 85/3 | 350.00 |
| 25) | 86/3/3 | 840.00 |
| 26) | 86/5 | 250.00 |
| 27) | 86/2 | 3740.00 |
| 28) | 86/6 ब/1/2 | |
| 29) | 86/6 ब/2 | |
| 30) | 87 | 1360.00 |
| 31) | 88 | 4190.00 |
| 32) | 100/1/2 | 3380.00 |
| 33) | 100/1/2 | 5170.00 |
| 34) | 101/2/1 | 4950.00 |
| 35) | 101/1 | 3130.00 |
| 36) | 102 | 5350.00 |
| 37) | 103/5 | 2500.00 |
| 38) | 103/4 | 1400.00 |
| 39) | 103/3 | 1400.00 |
| 40) | 103/4 | 2400.00 |
| 41) | 103/5 | 980.00 |
| 42) | 104/1 | 3800.00 |
| 43) | 104/1 | 5100.00 |
| 44) | 124 पै. | 2670.00 |
| | | 2580.00 |
| | | 990.00 |
| 45) | 123 पै. | 1830.00 |
| | | 2340.00 |
| | | 2380.00 |
| | | 2470.00 |
| | | 3010.00 |
| | | 770.00 |
| 46) | 127 | 50.00 |
| 47) | 120 | 4340.00 |
| | | 2760.00 |
| | | 150.00 |
| 48) | 128 | 5040.00 |
| | | 3125.00 |
| | | 450.00 |
| 49) | 119 | 1760.00 |
| | | 475.00 |
| | | 3830.00 |
| 50) | 131 | 1460.00 |
| 51) | 132 | 260.00 |
| | | 3180.00 |
| | | 1980.00 |
| | | 960.00 |
| | | 775.00 |
| | | 850.00 |
| | | 1950.00 |

**अनुसूची - दोन**
**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण**

**प्रकल्पाचे नाव :–** नाशिक शहराचा प्रस्तावित परिक्रमा मार्ग (रिंगरोड)
**प्रकल्पाच्या कामाचे वर्णन :–** नाशिक शहराचा प्रस्तावित परिक्रमा मार्ग (रिंगरोड) या सार्वजनिक प्रयोजनासाठी
**समाजाला होणारे लाभ :–** सार्वजनिक दळणवळण व्यवस्था बळकटीकरण.

**अनुसूची - तीन**
**पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन**

गावाचे नाव :– मौजे पाथर्डी तालुका :– नाशिक जिल्हा :– नाशिक

| अ. क्र. | भूमापन क्रमांक/गट नंबर | क्षेत्र (हेक्टर मध्ये) |
|---|---|---|
| | लागू नाही | – |

**अनुसूची - चार**
**पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश - लागू नाही**

**टिप :–** उक्त जमिनीच्या नकाशाचे उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) लघुपाटबंधारे, नाशिक या कार्यालयात निरीक्षण करता येवू शकेल.

ठिकाण – नाशिक
दिनांक : 26/04/2026

शिक्का


सही/–
**आयुष प्रसाद**
**जिल्हाधिकारी, नाशिक**

जा. क्र. जिमाका–नाशिक ५३/२०२६–२७
जिल्हा माहिती कार्यालय, वकीलवाडी, नाशिक
दिनांक :– ३०/४/२०२६

## आजचे वाढदिवस



**प्रसाद बावरी**
युवा नेते, हिंदू एकता आंदोलन पक्ष



**सोमनाथ मुठाळ**
विश्वस्त, सावाना


## उद्याचे वाढदिवस



**व्ही. डी. मिश्रा**
सेवानिवृत्त अतिरिक्त पोलीस महासंचालक



**कैलास दवंगे**
माजी मुद्रांक जिल्हाधिकारी



**संजय बाफणा**
संचालक, बाफणा बझार




**भागीनाथ घोटेकर**
मा. प्राचार्य, के. जे. मेहता हायस्कूल



**संतोष साळवे**
माजी नगरसेवक



**प्रसाद पवार**
आंतरराष्ट्रीय छायाचित्रकार



**कचरू आव्हाड**
महंत

# कुंभ उद्योग संगम व नाशिक जिल्हा गुंतवणूक परिषदेचे काटेकोर नियोजन करावे : दीपेंद्र सिंह कुशवाह

**नाशिक (जिमाका):–** सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर येत्या ६ मे रोजी नाशिक मध्ये कुंभ उद्योग संगम व जिल्हा गुंतवणूक परिषद २०२६ चे आयोजन करण्यात आले आहे. या अनुषंगाने सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयातून आवश्यक पूर्वतयारी व काटेकोरपणे नियोजन करावे, असे निर्देश उद्योग विकास आयुक्त तथा उद्योग संचालक दीपेंद्र सिंह कुशवाह यांनी दिले.



जिल्हाधिकारी कार्यालयातील मध्यवर्ती सभागृहात आयोजित बैठकीत आयुक्त कुशवाह बोलत होते. यावेळी सिंहस्थ कुंभमेळा विकास प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंह, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक नाशिक चेतन पाटील, अहिल्यानगरचे दीपक शिवदास, नंदूरबारचे निलेश गायकवाड, नाशिक महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त अमित रंजन, जिल्हा उद्योग केंद्राच्या सहसंचालक वैशाली सोने, कुंभमेळा प्राधिकरणाचे अतिरिक्त आयुक्त कमलाकर रणदिवे, औद्योगिक विकास महामंडळाचे प्रादेशिक व्यवस्थापक दीपक पाटील, उद्योजकता विभागाचे व्यवस्थापक आर. एस. साखरे, जिल्हा उद्योग केंद्राचे व्यवस्थापक प्रशांत पाटील, क्षेत्र अधिकारी मनीष महाजन, कुंभमेळा प्राधिकरणाचे तहसीलदार योगेश चंद्रे यांच्यासह अधिकारी उपस्थित होते. आयुक्त श्री. कुशवाह म्हणाले की, या परिषदेला राज्यातील मान्यवर मंत्री, वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी, उद्योगक्षेत्रातील प्रतिनिधी तसेच गुंतवणूकदार मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असल्याने कार्यक्रमाची अंमलबजावणी सुरळीत व प्रभावी होण्यासाठी सर्व विभागांनी जबाबदाऱ्या स्पष्ट करून वेळेत काम पूर्ण करावे, कार्यक्रमस्थळी सुरक्षा, वाहतूक व्यवस्थापन, पार्किंग सुविधा, प्रवेश नियंत्रण, नोंदणी व्यवस्था तसेच व्हीआयपी हालचालींसाठी स्वतंत्र नियोजन करण्यात यावे. यासाठी पोलीस विभाग, वाहतूक शाखा व स्थानिक प्रशासन यांच्यात समन्वय आवश्यक आहे. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी तांत्रिक व्यवस्था, सादरीकरणासाठी आवश्यक उपकरणे, ध्वनी व दृश्य प्रणाली, मीडिया समन्वय, स्वागत कक्ष व मार्गदर्शन व्यवस्था सक्षम ठेवावी. येणाऱ्या उद्योग प्रतिनिधी व गुंतवणूकदारांसाठी सुलभ नोंदणी, माहिती केंद्र, मार्गदर्शक कर्मचारी व हेल्पडेस्क उपलब्ध करून द्यावा. गुंतवणूक परिषद नाशिक जिल्ह्याच्या औद्योगिक प्रगतीसाठी महत्त्वपूर्ण असून, गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यासाठी सकारात्मक वातावरण निर्माण करणे सर्व यंत्रणांची सामूहिक जबाबदारी आहे. त्यामुळे नवउद्योजक व उद्योग क्षेत्रातील गुंतवणूकदार यांना याबाबत कळविण्यात येवून सहभागासाठी उद्युक्त करावे. प्रत्येक विभागाने आपापल्या जबाबदाऱ्या प्राधान्याने पार पाडून कार्यक्रम यशस्वी करावा असे आवाहनही त्यांनी केले. या परिषदेद्वारे नाशिकला औद्योगिक नकाशावर अधिक ठळक स्थान मिळेल, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला. सिंहस्थ कुंभमेळ्यानिमित्त नाशिक शहरात मोठ्या प्रमाणात पायाभूत सुविधा निर्माण होत असल्याने गुंतवणूकदारांना जिल्ह्यात गुंतवणूकीसाठी मोठी संधी निर्माण होणार असल्याचे कुंभमेळा आयुक्त शेखर सिंह यांनी सांगितले. जिल्ह्यातील वातावरण उद्योगस्नेही असल्याने भविष्यात उद्योग आणि गुंतवणूकदारांचा ओघ नाशिकमध्ये वाढणार असून यासाठी ही परिषद महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे जिल्हाधिकारी प्रसाद यांनी सांगितले.



# ऋतुरंग परिवाराकडून हभप त्र्यंबकराव गायकवाड व पं. शंकरराव वैरागकर यांचा गौरव

**नाशिकरोड (भ्रमर प्रतिनिधी) :–** ज्येष्ठ नागरिकांच्या आयुष्यात प्रेम आणि आपुलकीचे स्थान अत्यंत महत्त्वाचे असते. त्यांना भौतिक गरजांपेक्षा भावनिक आधाराची अधिक आवश्यकता असते. कुटुंबीय आणि समाजाने दिलेले प्रेम हेच त्यांच्या आयुष्याचे खरे समाधान ठरते. ज्येष्ठांचा सन्मान करणे म्हणजेच ईश्वरसेवेइतकेच पुण्य प्राप्त करणे होय, असे प्रतिपादन ज्येष्ठ नेते हभप त्र्यंबकराव गायकवाड यांनी केले.

सांस्कृतिक क्षेत्रात दोन दशकांहून अधिक काळ उल्लेखनीय कार्य करणाऱ्या 'ऋतुरंग' परिवारातर्फे विविध क्षेत्रातील योगदानाबद्दल गायकवाड यांच्यासह ज्येष्ठ संगीत साधक पं. शंकरराव वैरागकर यांना 'ऋतुरंग पुरस्कार' प्रदान करून सन्मानित करण्यात आले. या पुरस्कार वितरण सोहळ्याला उत्साहपूर्ण वातावरण लाभले. कार्यक्रमाचे अध्यक्ष विजय संकलेचा यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले. यावेळी प्रकाश पाटील, संतोष जोशी, शेखर कावळे, पूनमचंद ठोळे, राजीव शिरसाठ, सुभाष पाटील, अरविंद क्षीरसागर, सुरेश गवंडर यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तन्वी अमित यांनी केले.

सत्काराला उत्तर देताना पं. शंकरराव वैरागकर यांनी 'ऋतुरंग' परिवाराशी असलेले आपले नाते अधोरेखित केले. घरच्यांकडून मिळणारी दाद हीच खरी मोठी असते. आपल्या माणसांनी मान्यता दिली की बाहेरील जगही आपल्याला मान देते, असे ते म्हणाले. 'ऋतुरंग' ही केवळ नाशिकरोडची नव्हे, तर संपूर्ण नाशिकची सांस्कृतिक ओळख बनली असल्याचेही त्यांनी नमूद केले.

या प्रसंगी सागर कुलकर्णी, संगीत कुलकर्णी, बिंदिया जोशी, सुनीता सानप, विशाल जोशी आणि अस्मिता गाडेकर यांचा संगीत, नृत्य आणि योग क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या निमित्ताने आयोजित स्नेहसंमेलनात कथ्थक, भरतनाट्यम, योगासनांची देखणी सादरीकरणे झाली. त्यानंतर शास्त्रीय गायन व तबला वादनाने उपस्थित रसिक मंत्रमुग्ध झाले. या सांस्कृतिक मेजवानीला रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून दाद दिली.

'ऋतुरंग' परिवाराने आयोजित केलेला हा सोहळा सन्मान, संस्कृती आणि आपुलकीचा सुंदर संगम ठरला.

# गणपतराव आडके इन्स्टिट्यूट, कॉलेज ऑफ नर्सिंग पदवी व पदव्युत्तर समारंभ

**नाशिक (नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** सुखदेव महीपत मोरे पाटील प्रतिष्ठान संस्थेचे संस्थापक व अवयव दान चळवळीचे प्रणेते डॉ. भाऊसाहेब सुखदेव मोरे यांनी स्थापन केलेले गणपतराव आडके इन्स्टिट्यूट, कॉलेज ऑफ नर्सिंग द्वारका सर्कल नाशिक येथे पदवी व पदव्युत्तर समारंभ मोठ्या उत्साहात संपन्न झाला.



या समारंभास प्रमुख पाहुणे नारायणी हॉस्पिटलच्या डॉ. आदिती पटेल, संस्थेचे अध्यक्षा सुप्रिया मोरे व संस्थेचे प्रशासकीय अधिकारी प्रकाश पंड्या, प्राचार्य राघवेन्द्र एन.एस. व प्राध्यापक वर्ग व शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. तसेच नर्सिंग क्षेत्रातील सेवा, समर्पण व मानवतेचे महत्त्व अधोरेखित केले.

यावेळी पदवी व पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना पदवीप्रमाणपत्र व स्मृतीचिन्ह प्रदान करण्यात आले. कार्यक्रमात भाषणे, तसेच समाजसेवेची शपथ घेण्याचा समावेश होता.

महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल अभिमान व्यक्त करत त्यांना समाजासाठी निष्ठेने कार्य करण्याचे आवाहन केले. समारंभाचा शेवट आभार प्रदर्शनाने करण्यात आला आणि सर्व विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

# सोनाली होळकर यांना आदर्श शिक्षिका पुरस्कार जाहीर

**लासलगाव (भ्रमर वार्ताहर) :–** येथील सरस्वती विद्या मंदिर शाळेच्या शिक्षिका सोनाली होळकर यांना नाशिक डिस्ट्रिक्ट सेकंडरी टीचर्स अँड नॉन टीचिंग सोसायटीच्या वतीने देण्यात येणारा आदर्श शिक्षिका पुरस्कार जाहीर झाला आहे.



एनडीएसटी सोसायटी नाशिक यांच्यातर्फे दरवर्षी गुणवंत कर्मचाऱ्यांचा गुणगौरव केला जातो यावर्षी सरस्वती शाळेतील शिक्षिका सोनाली होळकर यांना एनडीएसटीमार्फत दिला जाणारा मानाचा आदर्श शिक्षिका पुरस्कार जाहीर करण्यात आला.

त्यांच्या या पुरस्काराबद्दल लासलगाव विद्या प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष अशोक होळकर, अध्यक्ष जगदीश होळकर, उपाध्यक्ष सुलेमान मुलानी, सचिव गुणवंत होळकर, तसेच कार्यकारी मंडळ व शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्यांचा गुणगौरव करून अभिनंदन केले.

## धावत्या मोटारीला भीषण आग

**पुणे (भ्रमर वृत्तसेवा):–** धावत्या मोटारीने अचानक पेट घेतल्याची घटना मुंबई–बेंगळुरू बाह्यवळण मार्गावरील स्वामी नारायण मंदिरासमोर घडली. मोटारतालकासह तिघे जण प्रसंगावधान राखून बाहेर पडल्याने मोठी दुर्घटना टळली.

# जनगणनेच्या राष्ट्रीय कार्यात सहभागी व्हा : गिरीश महाजन

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी):–** देशातील प्रत्येक नागरिकाने जनगणनेत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन जलसंपदा तथा कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन यांनी केले. नाशिक जिल्ह्यात १६ व्या जनगणनेच्या अंतर्गत कालपासून स्व–जनगणना सुरू झाली असून ती १५ मे २०२६ पर्यंत चालणार आहे. महाराष्ट्र दिनानिमित्त पोलीस कवायत मैदानावर झालेल्या ध्वजवंदन सोहळ्यानंतर जनगणना प्रक्रियेचा शुभारंभ करण्यात आला.

मंत्री गिरीश महाजन यांनी सांगितले की, जनगणना ही देशातील सर्वात मोठी प्रशासकीय प्रक्रिया असून तिच्या आधारे विकास योजना व पायाभूत सुविधा नियोजन केले जाते. यंदा प्रथमच ही प्रक्रिया डिजिटल माध्यमातून राबवली जात आहे. नागरिकांना https://se.census.gov.in या संकेतस्थळावर मराठीसह १३ भाषांमध्ये माहिती भरण्याची सुविधा उपलब्ध आहे. जे नागरिक स्व–जनगणना करू शकणार नाहीत, त्यांच्यासाठी १६ मे ते १४ जून दरम्यान प्रत्यक्ष घरोघरी जाऊन माहिती संकलन केले जाणार आहे.

यावेळी खा. डॉ. शोभा बच्छाव, महापौर हिमगौरी आडके–आहेर, विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. मंत्री महाजन यांनी मी जनगणनेत सहभागी होणार या सेल्फी पॉइंटवर सेल्फी घेत जनजागृती केली.

# नांदुर्डीतील टांगा शौकिनांचा अटकपूर्व जामीन फेटाळला

**निफाड (भ्रमर प्रतिनिधी) :–** तालुक्यातील नांदुर्डी येथील यात्रोत्सवात टांगा शर्यतीचे आयोजन करुन निष्काळजीपणा केल्याने एका वृध्दाचा मृत्यू झाल्याच्या गुन्ह्यातील सातही संशयितांचे अटकपूर्व जामीन अर्ज निफाडच्या जिल्हा व सत्र न्यायालयाने फेटाळले आहे. सर्व सातही संशयितांवर आता अटकेची टांगती तलवार आहे.

निफाड तालुक्यातील नांदुर्डी येथील यात्रोत्सवादरम्यान घोडा–बैलाची टांगा शर्यत न भरविण्याची पूर्वसूचना निफाड पोलिसांनी देऊनही सुरक्षिततेच्या उपाययोजना न करता टांगा शर्यत भरविण्यात आली. यात टांगा शर्यत पाहण्यासाठी आलेल्या ८८ वर्षीय रामनाथ शिंदे नामक वृध्दाचा टांग्याखाली येऊन मृत्यू झाला होता. याबाबत निफाड पोलीस ठाण्यात टांगा शर्यतीचे आयोजन करणारे संशयित सुभाष खापरे, राहुल खापरे, संजय आहेर, मधुकर कुंभार्डे, तानाजी खापरे, किशोर निकम, सोपान देवकर यांच्याविरुध्द प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम ११(१)भारतीय न्याय संहिता १०६ (१), २२३, २३९, ३(५) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला होता. या गुन्ह्यातील अटकेपासून संरक्षण मिळण्याकामी निफाड येथील जिल्हा व सत्र न्यायालयात अटकपूर्व जामीन अर्ज सादर करण्यात आला होता. यात सरकार पक्षाच्या वतीने सहायक जिल्हा सरकारी वकिल ॲड. आर. बी. शिंदे यांनी बाजू मांडत प्राण्यांचा छळ, तसेच समाजमाध्यमांत प्रसारित झालेला घटनेचा व्हिडिओ, टांगा चालकाचा शोध व घोडा गाडी जप्ती या कारणांसाठी अटकपूर्व जामीन अर्ज नामंजूर करण्याचा युक्तिवाद न्यायालयासमोर मांडला. निफाडचे जिल्हा व सत्र न्यायाधीश के. आर. जोगळेकर यांनी टांगा शर्यत आयोजकांचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळण्यात आला असल्याचे आदेश केले आहे. त्यामुळे टांगा आयोजकांवर अटकेची टांगती तलवार आहे. या गुन्ह्याचा तपास पोलिस निरिक्षक गणेश गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार के. बी. ढिकले करत आहेत.

## स्वारगेट आगारात सुरक्षारक्षक व रिक्षाचालकांमध्ये हाणामारी

**पुणे (भ्रमर वृत्तसेवा):–** स्वारगेट आगारातील प्रवेशद्वार येथे वारंवार रिक्षाचालक आणि आगार प्रशासनामध्ये वाद होत असल्याच्या तक्रारी येत आहेत. यामध्ये अनधिकृत रिक्षा पार्किंग आणि प्रवाशांना होणारा त्रास यामुळे येथील वातावरण नेहमीच संवेदनशील असते.

या घटनेमुळे प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. या प्रकरणी स्वारगेट पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. स्वारगेट आगाराच्या प्रवेशद्वारावर रिक्षा लावण्याच्या कारणावरून सुरक्षारक्षक आणि एका रिक्षाचालकामध्ये शाब्दिक चकमक उडाली. या वादाचे रूपांतर बघता बघता हाणामारीत झाले.

## नाशिकला ६ मे रोजी कुंभ उद्योग ...

**(पान १ वरून)** :– सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. या समिटच्या माध्यमातून काही नवीन सामंजस्य करार होतील. त्यांची माहिती ही माध्यमांना देण्यात येईल. कुंभ उद्योग संगम नाशिक डिस्ट्रिक्ट इन्व्हेस्टमेंट समिट मध्ये दिवसभर विविध विषयांवर चर्चा, परिसंवाद होईल, असेही उद्योग विकास आयुक्त कुशवाह यांनी सांगितले. कुंभमेळा प्राधिकरणाचे आयुक्त सिंह यांनी सांगितले की, कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर उद्योग, व्यावसायिकांशी संवाद साधण्यात येत आहे. त्यांच्या अडीअडचणी समजून घेत त्यावर मार्ग काढण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले. जिल्हाधिकारी आयुष प्रसाद म्हणाले की, ही गुंतवणूक परिषद उद्योजक आणि गुंतवणूकदार यांच्यासाठी महत्वाचा टप्पा असणार आहेत. भविष्यात नाशिक उद्योजक आणि गुंतवणूकदाराचे पहिल्या पसंतीचे इन्व्हेस्टमेंट डेस्टीनेशन ठरेल. अशी माहिती त्यांनी दिली.

# महात्मा फुले द्विशताब्दी जयंती वर्षानिमित्त भव्य राज्यस्तरीय कथा स्पर्धेचे आयोजन

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** महात्मा जोतिराव फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षानिमित्त 'विचार–जागर' विशेष साहित्यिक उपक्रमांतर्गत विचार–जागर मंचतर्फे राज्यस्तरीय कथा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. राज्यभरातील साहित्यप्रेमी व नवोदित कथाकारांना आपल्या लेखनकौशल्याला व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा या स्पर्धेचा उद्देश आहे.

या स्पर्धेत प्रथम पारितोषिक म्हणून ५०० रुपये किंमतीची पुस्तके, स्मृतिचिन्ह व सन्मानपत्र, द्वितीय पारितोषिक २५० रुपये किंमतीची पुस्तके, स्मृतिचिन्ह व सन्मानपत्र, तर तृतीय पारितोषिक २०० रुपये किंमतीची पुस्तके, स्मृतिचिन्ह व सन्मानपत्र देण्यात येणार आहे.

स्पर्धेसाठी सादर होणाऱ्या कथेचा आशय सामाजिक जीवनावर आधारित असावा. कथेची शब्दसंख्या १००० ते १२०० शब्दांपर्यंत मर्यादित ठेवण्यात आली असून कथा शुद्धलेखन व व्याकरणदृष्ट्या परिपूर्ण असणे आवश्यक आहे. तसेच कथा पूर्वी कुठेही प्रकाशित झालेली नसावी, अशी अट आयोजकांनी घातली आहे.

कथांचे परीक्षण वरील निकषांवर करण्यात येणार असून परीक्षकांचा निर्णय अंतिम राहणार आहे. स्पर्धकांनी याबाबत कोणतीही चौकशी करू नये, असे स्पष्ट करण्यात आले आहे. इच्छुक स्पर्धकांनी आपली कथा युनिकोड किंवा पीडीएफ स्वरूपात टाईप करून ३१ मेपर्यंत ९८५०६९७९४० या व्हॉट्सॲप क्रमांकावर पाठवावी. या स्पर्धेसाठी कथाकारांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन विचार– जागर मंचचे सप्तर्षी माळी, संजय आहेर व बाळासाहेब गिरी यांनी केले आहे.


## ॥ दशक्रिया विधी ॥



कळविण्यास अत्यंत वाईट वाटते की,

**कै.सौ.अदिती राहुल ढिकले**

यांना शनिवार, दिनांक २५ एप्रिल २०२६ रोजी देवाज्ञा झाली

**दशक्रिया विधी**

सोमवार दि. ४ मे २०२६ रोजी सकाळी ८ वाजता
ठिकाण- रामकुंड, नाशिक
गंधमुक्ती - लेवा पाटीदार भवन, रामकुंड नाशिक

**शोकाकुल**

आ. ॲड.श्री. राहुल उत्तमराव ढिकले
डॉ.श्री.सुनिल उत्तमराव ढिकले — श्री.चंद्रभान सिताराम पिंगळे
श्री.शेखर उत्तमराव ढिकले — श्री.ज्ञानेश्वर सिताराम पिंगळे
सौ. चारुशीला सुनिल खुणे — श्री.सचिन चंद्रभान पिंगळे
सौ. रोहिणी किरण पाटील — श्री.अमोल चंद्रभान पिंगळे
चि. डॉ.करण सुनिल ढिकले | चि.आर्यन शेखर ढिकले | चि.शौर्य राहुल ढिकले
समस्त ढिकले व पिंगळे परिवार


हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक संपादक श्री. चंदुलाल शाह यांनी चैतन्य आर्ट्स, सीताराम चेंबर्स, पेठ फाटा, पंचवटी, नाशिक-३ येथे छापून भ्रमर कार्यालय, सीताराम चेंबर्स, पेठ फाटा, पंचवटी, नाशिक -३ येथे प्रसिद्ध केले. दूरध्वनी २५१४६५०, २५११७६०
E-Mail-daily_bhramar@rediffmail.com नाशिकरोड संपर्क कार्यालय, बिटको क्लासिक, मुक्तिधाम समोर, नाशिकरोड, दूरध्वनी २४५६५४९. कार्यकारी संपादक- हितेश चंदुलाल शाह ✻ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.
Printed, Published and Owned by Shri. Chandulal Shah and printed at Chaitanya Arts, Sitaram Chambers, Peth Phata, Panchavati, Nashik-3 and published at Daily Bhramar, Sitaram Chambers, Peth Phata, Panchavati, Nashik-3. ✻ Editor : Chandulal Shah ✻ Executive Editor : Hitesh Chandulal Shah.